

शंभू गणपुले
एक मोकाट वारं

# एक मोकाट वारं

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# एक मोकाट वारं

## लेखक - शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान

# एक मोकाट वारं

लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मुपेठ वडगांव ., जिल्हा कोल्हापूर

संपर्क :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

jayant.karandikar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.
www. esahitybooks

**प्रकाशन :२९ जून २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

लेखकाचा परिचय



लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय     : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी.ए. , एल.एल.बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड,

सध्या लेखन,

प्रकाशित लेखन:  " ताओ उपनिषद" , कथा-कविता संग्रह -२

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास:  "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क  श्रीजयंत करंदिकर यांचे स्वाधीन ..

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492

या पुस्तकातील सर्व मते ही लेखकाची चिंतने असून त्यांच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या लेखनातून कोणालाही दुखावण्याचा वा टीका करण्याचा हेतू नाही याची नोंद घ्यावी.

# अर्पण पत्रिका


’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा  -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.


-- शंभू गणपुले

शंभू गणपुले यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित झालेली

आजवरची पुस्तके



# एक मोकाट वारं

**अंक १ ला**

**प्रवेश - १**

(पडदा उघडतो. रंगभूमीच्या अगदी पुढल्या भागात एका श्रीमंत माणसाच्या घराचा सजवलेली बेडरुम आणि खालची गॅलरी. श्री.सिंह आणि त्यांची पत्नी (डॅडी आणि मम्मी) बसले आहेत. डॅडी संध्याकाळचा पेपर चाळत आहेत. अर्धवट विणलेल्या स्वेटरची वीण चुकल्यामुळं मम्मी स्वेटर उसवत आणि उसवलेल्या लोकरीचा गुंडा तयार करत आहे. क्षणभरानं -

**मम्मी** - आज कपडे बदलायचे नाहीयेत कां ? तसेच बसला आहात म्हणून विचारत्येय्!

**डॅडी** - आय्.ए.एस.अधिकारी सरकारचा चोवीस तास नोकर असतो. कधी फोन येईल आणि पट्कन जावं लागेल त्याचा नेम नसतो.

मम्मी - त्या अधिकाऱ्याला घर, बायको, मुलगी पण असते. त्यांच्याकडही त्यानं लक्ष द्यावं. प्रियाचं लक्षण मला ठीक दिसत नाही. काय करते, कुठं जाते, केव्हा परत येणार ते सांगूनही जात नाही.

डॅडी - वीणच चुकली म्हणायची !

मम्मी - हो. प्रियाच्या जन्मापासून हाच टोमणा ऐकत आलीय् मी.

डॅडो - मी स्वेटरच्या विणीबद्दल बोलतोय !

मम्मी - कळलं ! नुसते टोमणे मारायला जातंय काय तुमचं. घराकडे मुलीकडं लक्ष दिलंत तर.....

डॅडी - हातातल्या कामावर लक्ष ठेव. स्वेटर विणता विणतां मुलीचा विचार करतेस म्हणून वीण बिघडते, आणि मुलीवर लक्ष ठेवायच्या वेळी स्वेटर विणतेस म्हणून मुलगी बिघडते.

मम्मी - प्रियाला मी बिघडवलं असं म्हणायचय् तुम्हाला? तुम्हीच तिला लाडाऊन ठेवलयत्. एकुलती एक मुलगी आहे म्हणून किती लाड करायचे? तीन वेळा शाळा बदलली वाटलवतं कॉलेजमध्ये गेल्यावर तरी फरक पडल. पण नाही. चार वर्षात तीन कोर्सेस बदलले. प्रत्येक गोष्टीत हवं नको पणा कसा चालेल?

डॅडी - (पेपरमधली जाहिरात वाचतो.) वधू पहिजे. सत्तावीस वर्षांच्या घटस्फोटित विनापत्य, सुशिक्षित, निमसरकारी नोकरी असलेल्या तरुणाला वधू पाहिजे. मा.उ. बारा हजार. हे भाऊ ! हां हाऽ मासिक उत्पन्न बारा हजार. अपेक्षा- अविवाहित, सुशिक्षित, सुंदर, सुडौल बांध्याची, गौरवर्णी, गृहकृत्यदक्ष आणि वैवाहिक संबंध टिकवण्याची इच्छा असलेल्या मुलीला प्रथम पसंती. देण्याघेण्याची अट नाही.

मम्मी - पहिली दोन लग्न मोडली? म्हणजे या माणसानं पहिलं लग्न केलवतं तरी कधी ?

डॅडी - पंचविसाव्या वर्षी!

ममी - तुम्हाला काय माहीत ?

डॅडी - मी त्या मुलाचा मामा आहे! बायकी प्रश्न विचारल्याशिवाय राहावतच नाही तुम्हाला.

ममी - पहिली दोन लग्न मोडली होती म्हणून विचारलं. कुणी अठराव्या वर्षी लग्न केलं आणि दुसऱ्याच दिवशी घटस्फोट घेतला तरी माझं काय जातंय्!

डॅडी - हवं नको या हट्टापाई प्रियानं कितीदाहि घटस्फोट घेतला तरी माझी हरकत नाही.

ममी - पुरे! पोटच्या पोरीबद्दल असा विचार कसा करू शकता तुम्ही ?

डॅडी - प्रियेऽ, हा सगळा आधुनिक काळाचा प्रभाव आहे. तो कुणाला चुकलाय?

(दारावरचो बेल वाजते. ममी बाहेर जाऊन परत येते.)

ममी - कावरे नावाचे गृहस्थ आलेत तुम्हाला भेटायला.

डॅडी - गृहस्थ? पंचवीस-सव्वीस वर्षाचा पोऱ्या आहे तो... अशी संशयानं बघू नकोस.

ममी - वधू पाहिजे ही जाहिरात त्यानंच तर दिली नाही ना?

(डॅडी हसतात. पाईप पेटवतात.)

ममी - त्याला आत बोलावूं का?

डॅडी - कुणाला किती वेळ ताटकळत ठेवायचं ते मला चांगलं कळतं. त्यात तू लक्ष घालू नकोस.

(त्याच वेळी प्रिया प णप णत प्रवेश करते.)

प्रिया - शीऽ! सिटी बसनं यायचं-जायचं म्हणजे वैताग आहे नुसता. डॅडी, मला कुठतरी नोकरी लाऊन द्या. बँकेत, खाजगी कंपनीत, म्युनिसिपालिटीत सुद्धा चालेल. आणि मला एक कार घेऊन द्या!

डॅडी - टाटा मोटर्सशी कालच माझं बोलणं झालंय्. त्यांना एक पर्सोनेल मॅनेजर हवाय.

ममी - तुम्ही दोघांनी हे काय चालवलंय? टाटा मोटर्सशी नाही जमलं तर नगरपालिकेत लावून देतो म्हणाल ! मॅनेजमेंटचा कोर्स सोडून.....

डॅडी - आयडिया वाईट नाही. नगरपालिकेचा एक-एक अधिकारी पांच वर्षात करोडपती होतो.... बायद वेऽ, बाहेर थांबलेला मुलगा महापौरांचा भाचा आहे. त्याला आंत पाठवा. आणि चहाचं बघा.... (ममो जाते.)

प्रिया - डॅडीऽऽ, महापौरांचा भाचा, म्हणजे 'तिसरा' किंवा 'चौथाच' असणार.

डॅडी - त काय बोलतीयस् ? तुझं तुला कळतंय का?

प्रिया - मॅनेजमेंटच्या कोर्सचा एवढा प ायदा झाला. मी पुरुषांच्या चार जाती-कॅटॅगरीज-ठरवून टाकल्या आहेत. एक ते चार. कोणताही पुरुष असो, त्यापैकी एका कॅटॅगरीत पि ट्ट बसलाच

पाहिजे. कॉलेजच्या प्रिन्सिपॉलशी आज सकाळी याच मुद्यावरून भांडण झालं माझं ! खादाड साला !

डॅडी - प्रियाऽ, तू खूप अेक्साईट झालेली दिसतीयस!

प्रिया - माझा शोधच तसा आहे. मी......

डॅडी - ओ.के., ओ.के. आपण तुझ्या संशोधनावर नंतर बोलू. तू थोडी झोप काढ. बाहेर माझ्या ऑफ़ोसमधला माणूस आलाय. तेंव्हा तू आत गेलीस तरी चालेल. नाही जाच!

प्रिया - डॅड इलेक्शन कमिशनरच्या ऑफ़ोसमध्ये इतका भित्रा आणि टकल्या माणूस असेल असं वाटलं नव्हतं. (हसू लागते.) तो तिसऱ्या कॅटॅगरीचा प्रतिनिधी असावा. शामळू, गटस् नसलेला...

डॅडी - प्रियाऽऽ प्लीज! (आत जायची खूण करतो.) ...कावरेऽ आत येऽऽ.

(कावरे आत येतो. प्रिया विरुद्ध बाजूला बाहेर जाते.)

(कावरेनं एक गुच्छ आणि लखोटा पाठीमागे दडवला आहे.)

गुड इव्हिनिंग! तुझी... वधू पाहिजे ही जाहिरात वाचली. फ़ोन वगैरे आले का कुणाचे?

कावरे - दोन फ़ोन आले. शिवाय तुम्हीपण माझ्यासाठी प्रयत्न करताच आहात.

डॅड - मी ?

कावरे - होऽ! आत्ता आत गेल्या त्या.....

डॅडी - नॉनसेन्स ! ती माझी मुलगी आहे. प्रिया नाव आहे तिचं.

कावरे - (घाबरुन) काऽय? सर, मला माफ़ करा. वाटल्यास मी त्यांची पण माफ़ी मागतो. मी अगदी दारासमोर उभं राहायला नको होतं. म्हणजे मला धक्का मारुन आत यावं लागलं नसतं त्यांना. सर, मला खरंच माफ़ करा, तुमच्या मुलीच्या पाया पडायलाही मी तयार आहे.

(डॅडींच्या पाया पडायला जातो. त्याच्या हातातला गुच्छ आणि पाकीट पाहून.)

डॅडी - काववरेऽऽ, इतकं कावरं बावरं होण्याचं कारण नाही. आम्ही दोघांनी तुझी माफी स्वीकारली आहे. बरं, पण तुझ्या हातात काय आहे?

कावरे - (गुच्छ देऊन) अभिनंदन सर! उद्यापासून महानगरपालिकेचे प्रशासक म्हणून तुमची नेमणूक झाली आहे.

(रंगमंचाच्या मागच्या बाजूला प्रियाची बेडरूम आहे. तिथं प्रकाश उजळतो. प्रिया बेडवर बसते.)

प्रिया - प्रशासक! पुरुषांची ही पाचवी कॅटॅगरी माझ्या लक्षातच आली नाही. चौघांना आपल्या मर्जीप्रमाणं वागायला, वाकायला लावणारा प्रशासक! मिस्टर सिंह! माझे डॅड ..... प्रशासक (जोरजोरात हसते.)

(क्षणभरानं डॉ.नवाथे प्रवेश करतात.)

डॅडी - डॉक्टर नवाथे? तुम्ही?. . . . अचानक कसे आलात?

नवाथे - तुमची मुलगी कुठाय?

डॅडी - तिच्या बेडरूममधे.

नवाथे - मी तिकडे जाते. तिला (बॅग घेऊन जाऊ लागतो.)

डॅडी - व्हॉट नॉनसेन्स! ती झोपली असेल. तिला बरं वाटत नव्हतं!

नवाथे - म्हणूनच तिला पूर्ण तपासायचीय. प्रि.गुण्यांच्या केबिनमधे प्रियानं खूपच गोंधळ घातला होता दुपारी. तिच्या म्हणण्याप्रमाणं प्रिन्सिपॉल एक नंबरचा खादाड आहे आणि मी चार नंबरचा स्त्रीलंपट आहे.

डॅडी - व्हॉट्? व्हॉट दॅट मीन्स?

नवाथे - ते तिचं तिला माहीत. व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या मूलभूत प्रेरणा आणि त्या अनुसार व्यक्तींची वर्तणूक यावर संशोधन चालू आहे तिचं. तिला तपासण्यासाठी प्रिन्सिपॉलनी मला बोलवून घेतलं. पण मी तिथं पोहोचण्यापूर्वीच प्रियानं पळ काढला होता. प्लीज मी प्रियाला तपासू कां? तिचं वागणं, बोलणं ॲबनॉर्मल आहे असं सिद्ध झालं तर तिला कॉलेजमधे ठेवायचं किंवा नाही ते ठरवावं लागेल.

डॅडी - प्रिया नॉर्मल आहे, असं सर्टीफिकेट देण्याचे किती पैसे हवेत तुम्हाला, डॉ.नवाथे?

नवाथे - मला एकदा तरी तपासू दे तिला, प्लीज! पैशासंबंधी नंतर बोलू!

डॅडी - चला!

(तिघं प्रियाच्या बेडरूममधे जातात.)

प्रिया - या डॉक्टर चवथे!

नवाथे - डॉ. नवाथे!

प्रिया - तेच हो! तुम्ही चौथे, हा तिसरा, भित्री भागुबाई! तुमचा दुसरा मित्र कुठं गेला? गुणे पहिल्या नंबरचे खादाड! तरी व्यवस्थापन शास्त्रात क्रांती करण्याच्या गप्पा मारतो.

डॅडी - व्हॉट नॉन्सेन्स? काय बोलतोयस त्याचं भान आहे का तुला?

नवाथे - तिचं वास्तवाचं भान कमी होत चाललंय्! डिस्टॉर्शन ऑफ् रिॲलिटी अकंपनीड् वुईथ डेल्यूजन्स ॲंड हॅल्यूसिनेशन्स?

डॅडी - व्हॉट यू मीन,? शी इज सफरिंग फ्रॉम स्किझोफ्रेनिया?

नवाथे - लक्षणं तरी तशीच दिसतायत्! ती आपल्या व्यवस्थेत बसूं शकणार नाही.

प्रिया - (हसून) तुम्ही कुठल्याही व्यवस्थेत फिट्ट बसतां! हेच तर रडगाणं आहे, आपल्या देशाचं, मिस्टर सिंह!! महानगरपालिकेचे नवे प्रशासक !! म्हणजे लोकप्रतिनिधी येतील जातील. पण तुम्ही कायम. तुमची व्यवस्थाही कायम!!

डॅडी - डॉक्टर, प्रियाला स्ट्राँग इंजेक्शन द्या, ओझोन लावा किंवा शॉक ट्रीटमेंट द्या. काय वाटेल ते करा पण ती नॉर्मल झाली पाहिजे.

कावरे - नको.... नको सर! मला शॉकची भिती वाटते.

डॅडी - तुमचा काय संबंध ?

कावरे - माणसां माणसात चांगले चांगले संबंध असले पाहिजेत. तरच व्यवस्था सुरळीत चालू राहील, असं कुठं तरी वाचल्याचं आठवतय्!

प्रिया - (कावऱ्याच्या खांद्यावर थाप मारुन) तो विचार म्हणजे सुद्धा एक भूल थाप आहे. चल. आपण जंगलातून एक फेरफटका मारुन येऊ या. तिथं व्यवस्था कशी राबवली जाते ते चेक करू या. मगच आपल्या व्यवस्थेवर चर्चा करू. चला, चला, म्हणते ना? (धाक दाखवल्याच्या स्वरात)

कावरे - नको, मला जंगलाची भिती वाटते!

प्रिया - मग तर चलच! मि.चवथे तुम्ही पण चला! (कावरेचा आणि नवाथेचा गळा/कॉलर पकडून) चला. जाता जाता प्रिन्सिपॉल आणि सभापतींना पण खेचून नेऊ या! (तिघं जाऊ लागतात. प्रिया क्षणभर थबकते) मिस्टर सिंग -- आय् मीन् सिंहराज, तुम्ही पण जमल्यास चक्कर मारा जंगलाकडं! सवड होईल तेंव्हा.....

(प्रिया हसत बाहेर जाते. दोघांना खेचून नेते. डॅडी क्षणभर विचार करत राहतात. अंधार)

✻ ✻ ✻

एक मोकाट वारं

**लेखक - शंभू गणपुले**

**अंक १**

**प्रवेश २**

(अरण्य. दिवस मावळायची वेळ. चार पुरुष मागून ढकलल्यासारखे प्रवेश करतात. थकलेले. खांद्यावरची ओझी खाली टाकून जमेल तिथं बसतात. क्षणभरानं प्रिया प्रवेश करते. ती इतरांपेक्षा थोडी उल्हसित.)

प्रिया - असे ढपाळू नका. अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे आपल्याला.

पहिला - (प्रि.गुणे) नाही. आता एक पाऊलही पुढं टाकता येणार नाही. काहीतरी खाल्लं पाहिजे. ही भूक.....

चौथा - (डॉ.नवाथे) यू आर राईट. आय्.ॲम् ऑलसो भुकेला. बट यू सी, व्हेन वुई आर ॲप्रोचिंग टु द भूक त्यावेळी आपल्याला भुकेचे तुकडे करावे लागतील. कारण प्रत्येकाची भूक वेगळी असते. मी नेहमीच असा अनलॅटिकल ॲप्रोच घेतो. उदाहरणार्थ- तुझी भूक, त्याची भूक, माझी भूक.... (प्रियाला जवळ ओढतो.) हिची भूक!!

दुसरा - च्यायला, वाटंनं येताना दिसेल त्या झ़डपात त्वाड खुपसलत. तरी भुक् भुक् हैच कां? भुकंचं काय पन करा. येक डुलकी घेतल्या बिगर आपुन प़डं जानार न्हाई.

पहिला - म्हणजे तू झोपणार? तुला भूक नाही लागली?

दुसरा - आरं लागलीया पन मर्द मराठा हाय्. भुकंचं चोचलं करन्याची सवंय न्हाई आम्हांस्नी. आमच्या शाण्णव पिढ्या भुक् भुक् करत बसल्या असत्या तर म्हाराष्ट्राला माकडानं बी इचारलं नसतं.

चौथा - माकडानं नव्हे, कुत्र्यानं!

दुसरा - त्येच त्ये. ह्यो भुक् भुक् म्हनाला म्हणून माकडानं म्हनलं. तर काय सांगत व्हतो म्या. हांऽ, न्हाई म्हनायला झोपेची वाईच खोड हाय. पन् आमची शाण्णव कुळं तलवारी गाजवत ऱ्हायली. थकवा ईल न्हायतर काय व्हईल? (आडवा होतो.)

पहिला - ए, तू झोपतोस काय? आपण इथंच मुक्काम करायचाय कां?

तिसरा - (कावरे) - (प्रचंड घाबरुन) इथं?

चौथा - प्रिया, इथं....?

प्रिया - सगळेच थकला असाल तर इथं. तू तिथं मी!

चौथा - थँक्स्! पुढं जाऊन तरी काय-जंगलच! एक्सक्यूज प ॉर गेटिंग लॉस्ट!!

तिसरा - नाही. नाही. पुढं एखादी आदिवासी वस्ती सापडेल. तिथं थोडीतरी जाग असेल. शेकोटी, धुनी असेल. तिथं घुबडं, जंगली जनावरं त्रास देणार नाहीत.

दुसरा - का रं? तुझी सटारली कां?

पहिला - घाबरु नकोस. आम्ही आहोत. कुणाकडं खाण्यासारखं काही आहे कां?

दुसरा - (प्रियाकडं बघून) मदनाच्या बेकरीतली लुसलुशीत डबल रोटी चालंल?

प्रिया - (दुसऱ्याच्या गालावर चापट मारुन) चल्, चावट मेला.

(चौथा तिला दूर ओढतो.)

तिसरा - एऽ नीट विचार करा. मला वाटतं आपण पुढं जाऊ या. कारण ही जागा चांगली नाही, म्हणजे अशुभ आहे, असं माझी मनोदेवता मला सांगत आहे.

दुसरा - आणखीन् काय म्हनतिया ती तुजी मनोदेवता?

तिसरा - म्हणतीय कि नव्या कामाचा आरंभ इथं-जंगलात करु नका.

प्रिया - मानव संस्कृतिचा जन्म आणि विकास जंगलात झाला हे तुझ्या मनो-देवतेला ठावूक नाही? आपले वेद, जंगलात जन्माला आल!!

चौथा - तरी निघतांना मी सांगितलं होतं कि हाडांमांसाची एकादी पुतळी बरोबर घे. म्हणजे निर्गुण निराकार मनोदेवता तुला त्रास देणार नाही. द प ॅार्मलेस.....

दुसरा - ओ मिश्टर, पब्लिक मधी बसलं म्हंजी चार चौघांना समजंल अशा भाशेत बोलावं. सरळ म्हराटीत सांग. गड्या, तू पन येकादं अंगवस्त्र आनलं असतंस प्रेशर डिव्हाइड झालं असतं.

तिसरा - तुम्ही मूळ विषयाला नसते प ाटे कां प ोडताय? माझं ऐकत कां नाही?

(सगळे मुद्दाम दुर्लक्ष्य करतात.)

पहिला - प्लीज, कुणाच्या पिशवीत कांही सापडतंय् कां बघा. खूप भूक लागलीय्.

प्रिया - माझ्याकडं डबल रोटी आहे. (सगळे चमकून तिच्याकडं बघतात.) खरा ब्रेड. पण खाशील कशांशी ?

पहिला - पाण्याशी खाईन, दे!

प्रिया - पाणी सुद्धा संपलंय. (वॅाटर बॅग उलटी करते.)

पहिला - मगाशी येताना वाटेत पाण्याचा झरा दिसला होता.

दुसरा - मंग त्याच येळी वॅाटर बॅग भरून घ्यायची कि राव आयला, तुमचं म्हंजी असंच. बारशाचा दीस उजाडला तरी तुमी सुईण शोधत ऱ्हाणार.

पहिला - तुला सुद्धा हे शहाणपण सुचलंय्. (तिसऱ्याला) तू पाणी घऊन येतोस? झरा जवळच आहे.

तिसरा - मी- अंधारात जायचं? छेऽछेऽऽ.

पहिला - (दुसऱ्याला) तू जातोस?

दुसरा - (पहिल्याचा गळा पकडून) मला पाणक्या समजलास काय रं? आरं तलवारीचं पानी पाजण्याची जात आमची, आन् मला पानी भरायला सांगतुयास? तुज्या आयला, आमच्या शाण्णव पिढ्या....

पहिला - कळलं.(चवथ्याला) तुला विचारण्यात अर्थच नाही.

प्रिया - तुला तहान लागलीय ना, मग तू स्वतःच कां जात नाहीस?

(पहिला वॉटर बॅक घेऊन, इतरांवर चरफडत जावू लागतो.)

पहिला - मी जातोय्. पण लक्षात ठेवा पाण्याचा एक थेंब मिळायचा नाही तुम्हाला. (जाण्यासाठी वळतो.)

तिसरा - खरंच निघालास? भीति नाही ना वाटणार?

पहिला - भिती? कुणाची? कशाची? तहानेला, भुकेला माणूस पाप करायला सुद्धा घाबरत नाही.

दुसरा - बोंबलताय् कशाला? तुमच्या आयला, गोरगरिबांनी पाप करून प्वॉट भरावं अशीच तुमची समाज रचना हाय्.

पहिला - ती रचना बदलली पाहिजे.

दुसरा - व्हय्, बदललीच पायजे. त्या नव्या समाज रचन्येचं काम आमच्याकडं लागलं. तू पानी घिऊन ये.

(पहिला जावू लागतो.)

तिसरा - सांभाळून जा.

पहिला - पुन्हा तेच. सांभाळायला उरलंय् काय?

तिसरा - स्वतःचा जीव तरी सांभाळला पाहिजे. वाटते जंगलो जनावरं, भुतं...(पहिला जातो.)

चौथा - शिवाय आपण केलेल्या लफड्याच्या सावल्या सुद्धा अशावेळी पाठलाग करून भिती दाखवतात.

तिसरा - मला डिवचूं नकोस. मी एकट्यानं काहीहि केलं नव्हतं. प्रत्येक लफड्यात तुम्ही सगळे भागीदार होता.

चौथा - अरे पण, तुझ्या भेदरटपणामुळं सगळं उघडकीस आलं ना? भ्याऽ, भ्या साल्यो, प्रत्येक गोष्टीला भ्या. ए डे विल कम्.... आरशांत स्वतःचं थोबाड बघून सुद्धा घाबरशील एक दिवस!

तिसरा - तुला कसं कळलं? नाही.... म्हणजे.... खरंच तसं झालंय्! मला हल्ली आरशात बघायची सुद्धा भीति वाटायला लागली आहे.

दुसरा - वाटनारच! पापी मानसाच मन त्येला टोचत ऱ्हानार...'तू ह्ये क्येलंस. त्ये क्येलं न्हाईस. तू पापी हैस!'

चौथा - हंबग्! साला, इतक्या पोरी-बाळी फिरवल्या, पण पापाची कल्पना सुद्धा मनाला कधी शिवली नाही. यू सी..... यू मस्ट हॅव् सॉर्ट् ऑफ्... आत्मविश्वास! 'मी करतोय् तेच योग्य आहे. त्यातच माझं भलं आहे' असा विश्वास पाहिजे. तसा असेल तर तुमच्याकडं बोट दाखवायची हिम्मत नाही होणार कुणाची!!

दुसरा - असं म्हंता. मंग काई फिकीर न्हाई. त्या इस्वासावरच इथवंर रेटत आलो.(आडवा होतो.) आमच्याकडं बोट दावायचं न्हाई !

तिसरा - तुमच्याकडं कोण बोट दाखवणार? नंगेसे खुदाभी डरता है.

चौथा - सीऽ डर! फियर कॉम्प्लेक्स!! माणसानं परमेश्वरावर सुद्धा भयगंड लादला आहे. शिट्!! नंगेसे तुमचा खुदा डरत असेल. स्त्रिया नाही डरत. 'एकावेळी एक' या व्रताचा जोरच असतो तेवढा. काय प्रिया ? (प्रिया चौथ्याला ढुशी देते.)

प्रिया - इश्शऽऽऽ! चावटपणा पुरे हंऽ!

चौथा - पुरे म्हटलं तर (पुन्हा ढुशी देते.)

तिसरा - एऽऽ माझ्या समोर असले चाळे करु नकाऽ!

प्रिया - कां? यांत आक्षेपार्ह काय आहे?

चौथा - कांही नाही. पण 'त्या' प्रकरणापासून प्रेमाच्या बारिक सारिक चाळ्यांना सुद्धा हा घाबरतो.

प्रिया - कोणत्या प्रकरणापासून ?

चौथा - त्या गंऽ, तीन नंबरच्या शाळेतली मास्तरीण.

प्रिया - (एकाएकी गंभीर होऊन.) तीऽ? स्वच्छता सप्ताहांत हा मुद्दाम जिच्या वॉर्डमधे जायचा?

चौथा - तीच! यानं वार्ड साफ केला. तिनं याला साफ केलं.

तिसरा - तूच सांगितलं होतंस.....

चौथा - शट् अप्! तिच्यामागं झाडू घेऊन नाचायला नव्हतं सांगितलं! म्हटलं होतं.... इफ् यू आर इंटरेस्टेड इन हर.... तू शिक्षण समितीचा अध्यक्ष आहेस. एक दिवस ऑफिसमधे बोलावून घे. चांगली खरडपट्टी काढ. रडायला लागली कि पाठीवरून हात फिरव. दोघांच्य अंगावर त्याही परिस्थितीत काटा उभा राहिला तर समज काम फत्ते!! इट्वाज् देट सिंपल.

तिसरा - तसंच केलं. पण तू म्हणालास तसं काहीच झालं नाही. उलटंच घडलं.... ती माझ्या कॅबिनमधे घुसली. हातावर येऊन बसली..... म्हणजे खुर्चीच्या हातावर.

प्रिया - (तिसऱ्याच्या जवळ जावून, मास्तरीण कसं बोलली असेल त्या आविर्भावात) साहेब, मला कशाला बोलावलंत ते कळलंऽऽ! साहेब मला तीन नंबरच्या शाळेची हेड मिस्ट्रेस कराऽ नाऽऽ! मग रोज माझ्या खाजगी वॉर्डाची सफाई केलीत तरी मला आनंदच होईल.

चौथा - नेमक्या या वाक्याला फोटोग्राफर फोटो काढतो.

प्रिया - खटॅक्!

चौथा - नगरपालिका चालवतायृत.  हे शिक्षण समितीचे अध्यक्ष! बुल शिट्! फोटोग्राफर आंत आला कसा ?

तिसरा - तिनंच आणला होता, मला ब्लॅकमेल करण्यासाठी.

चौथा - हे तुला आता कळलं? ती बिनधास तुझ्या कॅबिनमधे घुसली त्यावेळीच तुला वास आला असता आणि कमरेत लाथ घालून तिला बाहेर काढली असतीस तर....

तिसरा - पण तूच सांगितलं होतंस की......

चौथा - स्त्री-पुरुष संबंधात सांगकामेपणा चालत नाही. क्षणाक्षणाला तुमचे तुम्हाला निर्णय घ्यावे लागतात. साला, लफडी करायच्या आधी ती पचवायची कशी त्याचं शिक्षण घ्या. नागिणीशी चाळे करायला गेलास आणि तिनं आख्ख्या नगरपालिकेला दंश केला.

तिसरा - आरोग्य समितीचा अध्यक्ष होऊन तू काय दिवे लावलेस ते ठाऊक आहे मला. पालिकेच्या सेवेतल्या शेकडा सत्तरजणींना गुप्तरोगाची लागण झाल्याचा आरोग्य खात्याचाच रिपोर्ट आहे.

चौथा - शट् अप्!

तिसरा - यू शट अप्!!

दुसरा - (जागा होवून) एऽ! बोक्या परमानं एकमेकावर गुरगुरु नका. समद्या भानगडीची इनकुयरी करन्यासाठी गुप्त समिती नेमलीय्. रिपोट येईपर्यंत झोपा गुमान.

चौथा - काय एक एक रत्नं भेटली आहेत! अहो नगराध्यक्ष, उप सभापती, उठा! डोळसपणे बघा आपली काय दुर्दशा झाली आहे.

प्रिया - उखाळ्या पाखाळ्या पुरेत. त्या पेक्षा विचार करा आपण इतक्या दूर कशासाठी आलो आहोत?

(सगळे आज्ञाधारकपणे विचार करू लागतात.)

तिसरा - चवताळलेल्या नागरिकांची भीति वाटत होती म्हणून इक डं आलो.

प्रिया - श्शी! भितीऽ!

दुसरा - मुनशीपाल्टीच्या झवझवीतनं भाईर पडून चार दिवस निवांत झोपायला मिळावं म्हनून हिकडं आलो.

प्रिया - च् च् च् !

चौथा - तुझ्या बरोबर पाहिजे तेवढा एकांत मिळत नव्हता म्हणून इकडं आलो. अवे प ॉम द डिस्गास्टिंग क्राउ ड.

प्रिया - रियली?

चौथा - तू आम्हाला इकडं कशासाठी आणलयस्? ते सांगून टाक. म्हणजे प्रत्येक जण आपापल्या कामाला लागल.

प्रिया - तुमच्यावरची सगळी बंधनं, दडपणं तुम्ही विसरावी, मनन, चिंतन करावं आणि त्यातून काही नवा मार्ग, नवी दिशा, नवी व्यवस्था सापडतीय् का ते बघावं...

दुसरा - म्या पडल्या पडल्या न्हेमी त्येच करत असतो. तुमचं चालू द्या. म्या आलोच. (करंगळी दाखवून बाहेर जातो.)

तिसरा - चिंतन ही विचारांची जननी आहे. मला आईची भिती वाटते. आयमीन मला चिंतन अवस्थेची भिती वाटते.

चौथा - आय् डोंट बिलीव्ह इन् चिंतन बितन. माझा कृतीवर विश्वास आहे.

तिसरा - हा प्रत्येक विषयाला प ाटे प ोडतो बाईऽ!

प्रिया - (अंगावर झुरळ चढल्याप्रमाणं किंचाळते) ईऽऽऽ

तिसरा - काय झालं?

प्रिया - मला काय म्हणालास, बाई? तीन नंबरच्या शाळेतली मास्तरीण नाहीय्ये मी. मी टाटा मोटर्समधे नोकरी करते.

तिसरा - तिथं बायकांना कशी हांक मारतात?

प्रिया - सरळ नावानं हाक मारतात.

तिसरा - नावानं? त्यापेक्षा मी तुम्हाला सोनिया म्हणू?

प्रिया - सोनिया?

तिसरा - मगाशी येताना-संधी प्रकाशात तुमचा गोरा रंग सोन्यासारखा झगमगत होता. म्हणून सोनिया!

चौथा - चुप् बेऽऽ!

प्रिया - माझं पुन्हा बारसं केलेलं त्याला नाही आवडणार. तू मला प्रियाच म्हण. ए म्हण ना रे!

तिसरा - पण...पण....प्र

प्रिया - हं म्हण. प्र ला पहिली वेलांटी .....?

तिसरा - प्रि.....प्रि..... नाही मला भिती वाटते.

चौथा - पेकाटात लाथ घालीन.

प्रिया - रागावूं नकोस रेऽ!

चौथा - मग काय मांडीवर बसवून घेऊन तुझं नाव गिरवून घेऊं? तुला प्रिया म्हणायची भिती वाटण्याचं काही कारण आहे कां? या भितीपोटीच वनवास भोगायची पाळी आलीय् आपल्यावर!

प्रिया - पुन्हा पुन्हा त्याच्या भित्रेपणावर घसरुं नकोस! त्याच्या भित्रेपणामुळं तुमची इज्जत थोडी पार वाचलीय्. नाही तर तोंडाला डांबर फासून, गाढवावरून धिंड काढली असती नागरिकांनी.

तिसरा - थँक्यू. थँक्यू. मला समजून घेणारं एक तरी माणूस आहे.

प्रिया - कोण आहे ते माणूस?

तिसरा - तुम्ही.

प्रिया - माझं नाव काय?

तिसरा - प्रि...प्रि.... प्रिया

(सगळे हसतात त्याचवेळी दुसरा कडमडत येऊन स्टेजवर पडतो.)

तिसरा - (घाबरुन ओरडतो.) कोण आहे?

प्रिया - काय झालं रे?

दुसरा - कशाला तरी अडखळून पडलो. (आला त्या दिशेला उठून जाऊ लागतो.)

तिसरा - परत कशाला जातोस. असेल झाडाची फांदी बिंदी!

दुसरा - फांदी नाही. माझ्या पायाला पाच बोटांचा स्पर्श झाला.

तिसरा - म्हणजे स्वतःच्याच पायात पाय अडखळला तुझा. (हसतो.)

दुसरा - मूर्ख आहेस. बोटं हाताची होती.

चौथा - चल बघूया.

(दोघं जातात. काही क्षणानंतर परत येतात. त्याच्याजवळ मनगटापासून तुटलेला हाडांचा पंजा आहे. सगळे पंजाचं निरीक्षण करतात)

चौथा - हंऽ तर या पंजानं तुझा पाय मागं खेचला.

दुसरा - तेच सांगत होतो.

तिसरा - सांगत नव्हतो? ही जागा अशुभ आहे. राम...राम..... राम...राम.

चौथा - कुणाचा असल हा पंजा? मला वाटतं एकाद्या स्त्रीचा पंजा असावा.

पहिला - लहान वाटतोय्. चौदा-पंधरा वर्षाच्या म़लाचा पण असू शकतो.

चौथा - नो. इफ् यू ऑब्झर्व केअरफ़ली यू विल कम टू द निष्कर्ष कि हा बाईचा पंजा आहे. युसी.... हाडांची पूर्ण वाढ झालीय् तरीही ती किती मुलायम आहेत.

(पंजाची बोटं स्वतःच्या गालावरुन फिरवतो. प्रिया त्याच्या हाताला झटका मारते.)

चौथा - काय झालं?

पहिला - सवती मत्सर.

प्रिया - हुँऽ! (प्रिया फणकाऱ्यानं बाहेर जाते.)

तिसरा - तू तिकडं कशाला निघालीस. प्लीज तिला आवरा (दुसऱ्याला हलवून उठवतो.) तू तरी तिला परत बोलाव.

दुसरा - वाक् औट करणाऱ्या मेंब्रांनी परत यावं असं म्या औव्हान करतो.

चौथा - आवाहन.

दुसरा - त्येच त्ये. याऽऽऽ! (पुन्हा झोपतो.)

प्रिया - (प्रवेश करून) बाई, बाई, बाई, माणसं कुठल्या थराला जातील त्याचा काही भरवंसा नाही. सभापती महोदय,(२ऱ्याच्या तोंडावर फ़कर घालते.) उठाऽऽ!

दुसरा - (हळूहळू उठत) तिच्या मारीऽ, कस्तुरीनं घाळलेला प्‌कर, मदमस्त प्‌करांत घोळलेली मस्तानीची साद ‘उठाऽ’. तलवार गाजवून थकलेला बाजीराव ती साद ऐकून उठला न्हाई तर मस्तानी मस्तानी न्हवं आन्‌ इष्कात पागल झालेला बाजीराव, बाजीराव नव्हं.

प्रिया - मिस्टर बाजीराव, आय्‌ मीन मिस्टर सभापतीऽ, मस्तानीच्या महालातून थोडावेळ बाहेर या !

दुसरा - आयला, आमचं सपान मोडलंत. वर वरडताय कशाला? खालच्या पट्टीत बोला. (प्रिया त्याच्या कानांत सांगते.) आं? ही बातमी कानात सांगन्या सारकी न्हाय्! बोंबा-बोंब करा.

प्रिया - (चढ्या आवाजात.) एका बाईचा खून झालाय्, खून!!

दुसरा - हळु बोला. आयला, बाई ही काय खून करन्याची वस्तू हाय? कुनी केला खून? समोर आना. उबा चिरुन टाकतो साल्याला.

प्रिया - खुनी लवकरच सापडेल. सध्या, खून झालेल्या स्त्रीचे काही सौभाग्य अलंकार सापडलेत- म्हणजे बांगड्यांचे तुकडे, अंगठी वगैरे. या वस्तू माझ्या ओळखीच्या वाटतायत् त्यावरुन असा अंदाज बांधता येईल कि खून झालेली मुलगी आपल्या गावातलीच होती, तुमच्या सगळ्यांच्या ओळखीची होती.

सगळे - आमच्या?

प्रिया - ही अंगठी पाहिल्यावर ओळख पटेल कदाचित.

(अंगठी पाहून एकमेकांकडं देतात.)

सगळे - (आळीपाळीनं) छे बुवा, माझ्या आळखीची नाही ही अंगठी.

पिखया - खरंच नाही? (सगळे नकारार्थी मान हलवतात.) जाऊदे मी तुमची गंमत केली. (चौथ्याला) तू असं कर, ही अंगछी तू माझ्या बोटांत घाल. या दिवसाची आठवण म्हणून. शिवाय

खुनाच्या रहस्यातला हा मुख्य दुवा माझ्या हातात सुरक्षित राहील. (चौथा थोडा भांबावलेला) कां रे? विचार कसला करतोयस्?

चौथा - विचार म्हणजे.... तुझ्या बोटांत अंगठी घालायचीच असेल तर मी नवी अंगठी घालीन. माझ्या खर्चानं. युसीऽ, प्रेताच्या टाळूवरचं लोणी चाटायची सवय नाही मला.

प्रिया - रियली?

चौथा - व्हॉट् डू यू मीन?

तिसरा - एवढ्या तवढ्यावरून भांडू नका. घालून टाक पटकन्. तू घालणार नसलास तर मी घालतो. आहे काय अन् नाही काय!

प्रिया - अय्या, बरीच भीड चेपली की तुझी! पण एक लक्षात ठेव ही साखर पुड्याची अंगठी नाही हं. (डोळा मारते.)

तिसरा - काही तरीच. तसं समजण्याइतका मी धीट नाही. इकडे तिकडं पडू नये, पुन्हा हरवू नये म्हणून अंगठी बोटात घालून ठेवायची. आहे काय अन् नाही काय! (अंगठी प्रियाच्या बोटात घालतो. प्रिया मूळ झाकून घेते. तिसरा तिची मूठ दोन्ही हातात धरतो. अचानक त्याला हुडहुडी भरते.)

प्रिया - काय झाले रेऽ? माझ्या स्पर्शानं हुडहुडी भरली तुला?

तिसरा - नाही नाही. थंडी वाढतीय्, अंधार पण वाढत चाललाय्, म्हणून किंचित अंग शहारलं!

पहिला - या पंजाचं काय करायचं?

चौथा - सापडला तिथंच पुरुन टाकूया!

तिसरा - नको. आणखी काही अवशेष सापडले तर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करुया. वाटल्यास श्राद्ध पण करून टाकू.

प्रिया - खुनाची भानगड उपटल्यापासून तुला भलताच उत्साह आलाय्!

चौथा - उत्साह भितीपोटी. त्या बाईचा अतृप्त प्रेतात्मा मानगुटीवर बसेल म्हणून भिती.

तिसरा - होऽ म्हणूनच! म्हणूनच!!

दुसरा - सबाग्रहाचं येक मत झालंय तोच कामाला लागा.

पहिला - त्या आधी मी थोडं खाऊन घेतो !

दुसरा - झाली प ाटाप् टीला सुर्वात. पन पाइंट ऑप् ऑर्डर इचार करन्यासारका हाय्. तू खाऊन घे. म्या वाईच डुलकी घेतो. हा पेध्रा राखन करील. तुमी दोघं काय करनार त्ये तुमीच ठरवा. (आडवा होतो.)

प्रिया - कितो मुर्दाड आहात? (सगळे सावरुन बसतात.) तुला थंडी वाजतीय ना, तू शेकोटी तयार कर. त्यातच अग्नि देऊ. शिल्लक उरलेल्या अस्थींना.

तिसरा - चालेल. आणि श्राद्ध उद्या संगमावर करूं.

चौथा - संगमावर श्राद्ध? बुलशिट! साली, साध्वी होती का रांड होती ते ठाऊक नाही आणि संगमावर श्राद्ध?...

प्रिया - तिच्या नीतिमत्तेचं मरणोत्तर विच्छेदन करू नकोस.

चौथा - बाय् द वे, तुला तिचा एवढा पुळका कां ? कोण होती ती तुझी? आणि अंगठी सारखी अंगठी नसते? तेवढ्यावरून तू.....

प्रिया - तिचं माझं नातं होतं का नव्हतं हा प्रश्न नाही. प्रश्न आहे, एका मेलेल्या स्त्रीच्या सन्मानाचा. मुकाट्यानं तयारी करा.

चौथा - घरनं निघतांना आपलं ठरलं होतं कि तू आमच्यावर प ार दडपण आणणार नाहीस. प क्त नवं काही निर्माण करायला मदत करशील.

प्रिया - मधेच ही प्रेताची भानगड निघाली. अग्नि दिल्यानंतर मी दिलेला शब्द पाळीन. कामाला लागा.

दुसरा - ऑर्डर देणारी तू कोन? म्या सबापती हाय्. एऽ, ही म्हनतिया त्या परमानं कामाला लागा. पंद्रा मिनिटाच्या आत उरका सगळं.

(सगळे कामाला लागतात. पहिला, दुसरा, चौथा आणि प्रिया बाहेर जातात. तिसरा शेकोटी तयार करतो. नंतर चौघं प्रवेश करतात. दुसऱ्याच्या टोपीत आणखी कांही अस्थि गोळा करून आणल्या आहेत.)

प्रिया - सभापती महोदय, अस्थि शेकोटीत-चितेत-टाका.

दुसरा - हाडकं चित्येवर चढवायची? अवो त्यो उलटा परकार झाला.

प्रिया - उलट्या सुलट्याशी आपल्याला काय करायचंय्. युद्धात शहीद झालेल्या शूर सैनिकांना मानवंदना देण्यासाठी जिवंत सैनिक बंदुका उलट्या करतात. जगाचे रीतिरिवाज असेच उलटे आहेत. राहणार आहेत.

चौथा - ते बदलणार कोण ?

प्रिया - आपण. पण त्या ऐवजी काय करायचं ते कळलं पाहिजे. तो पर्यंत..... टाका, हाडकं चितेत!

दुसरा - ही म्हनतिया तसं सुरु करा.

(तिसरा श्राद्धासाठी हाडाचे तीन-चार बारिक तुकडे काढून ठेवतो. सभापती उरलेली हाडकं शेकोटीत टाकतो. सगळे शेकोटीला प्रदक्षणा घालतात. नंतर श्राद्ध करायला बसतात.)

तिसरा - श्राद्ध करूनच टाकू. कुणाला मंत्र येतात ?

पहिला - मला येतात. (दुसरा हसतो.) हसूं नकोस. पोथ्या, पुराणं वाचून दाखवून पोट भरत नव्हतं म्हणून मी डाव्या विचारसारणीकडं वळलो असं समजू नकोस. ते माझं जीवन ध्येय आहे. तुझ्या सारखा चिकटू आणि संधी साधू नाहीय्ये मी. दिसली खुर्ची कि धावला.

दुसरा - तुमच्या आयला, आमच्या लंगोटीला धरून जलमभर धावलांत. आन्.....

प्रिया - उखाळ्या पाखाळ्या नकोयत्. कर्म सुरु करा.

पहिला - पिंड दान कोण करणार ?

चौथा - (तिसऱ्याला उद्देशून) हा पेद्रा करील.

तिसरा - म...म...माझा काय संबंध?

दुसरा - त्या बाईशी कुनाचाच संबंध नव्हता. पन् कुनीतरी केलं पायजे. वाद नगं. म्या करतो.

पहिला - (काही मंत्र पुटपुटल्या सारखं करून) हं, म्हणा, बाईचं आडनाव काय?

तिसरा - हर्णेकर- म्हणजे तसं समजू या.

पहिला - हं म्हणा शुभ गोत्रस्य हर्णेकर कुलोत्पन्नस्य.. बाईचे नाव?

दुसरा - शालिनी. (सगळे चकित)

पहिला - हं! शुभ गोत्रस्य हर्णेकर कुलोत्पन्नस्य शालिनी नाम्ना अस्य प्रेतस्य (एकदम आठवल्यासारखं करून, उठून, बोलत बोलत एका कोपऱ्यात जातो.) शालिनी हर्णेकर.

प्रिया - तीन नंबरच्या म्युनिसिपल शाळेची हेड मिस्ट्रेस होण्याची स्वप्नं बघणारी.(दुसऱ्या कोपऱ्यात येते.)

चौथा - (बोलत बोलत पहिल्याच्या जवळ जातो.) शालिनी हर्णेकर. वय बावीस. उंची पाच प्‌ट चार इंच. गौरवर्ण. केसांचा लांब शेपटा. शेपटा हलवत चालायची तेव्हा वाटायचं कि पोटाच्या खाली कुणीतरी हळुवार गुद्दे मारतंय्.

पहिला - शिक्षण समितीच्या अध्यक्षांनी प्रमोशनची लालूच दाखवून तिला एक दिवस आपल्या केबिनमधे बोलावून घेतली.

प्रिया - त्याच्या आदल्या दिवशी ही अंगठी तिच्या बोटात घालून तिला कुणीतरी लग्नाचं वचन दिलं होतं, म्हणे.

पहिला - शील भ्रष्ट झाल्यावर ती एकदम गायब झाली.

तिसरा - शालिनी तिच्या मामाकडं गेली होती. तिथूनच तिनं राजिनामा पाठवून दिला.

दुसरा - राजीनाम्यावरची सही खोटी असल्याचं इनकुयरीत आढळलं व्होतं पन्.

प्रिया - पण सही खरी असल्याचा खोटा निर्वाळा तुम्ही सभागृहात दिलात.

(पहिला तिसऱ्याची आणि चौथा दुसऱ्याची कॉलर धरतो.)

पहिला/चौथा- गाढवांनो तुम्ही मारलीत तिला?

प्रिया - शट अप्. तुम्ही सगळे त्या कटात सामील होता.

पहिला - तिचा बंदोबस्त करण्याच्या प्रस्तावाला फक्त मी संमती दिली होती.

चौथा - मी तर सांगितलं होतं- झालं गेलं विसरुन तिला माझ्याकडं पाठवून द्या.

प्रिया - चर्चा चालू ठेवायचीच असेल तर माझी हरकत नाही.

तिसरा - नको, नको!

प्रिया - मग कार्य चालू करा.

(सगळे पुन्हा बसतात. १ला मंत्र सुरु करतो.)

पहिला- हंऽ, शुभ गोत्रस्य हर्णेकर कुलात्पन्नस्य शालिनी नाम्ना अस्य प्रेतस्य, महानिर्वाण मार्गेच, स्वर्गद्वारे च, क्षुधा, तृषा, शीत पीडा निवारणार्थ-इदं अन्नम्!... प्रिया, ब्रेड आणून ठेव आणि तुम्ही सगळे ब्रेडवर पाणी सोडा (तसं करतात.) शाबास! (सगळा ब्रेड ताब्यात घेतो.) इदं पेयम्-पाण्यावर पाणी सोडा.(तसं करतात.) इदं वस्त्रम्- तुम्ही पात्तळावर पाणी सोडा.

चौथा - ते तिनं केव्हाच सोडलंय्. म्हणून तर ती स्कर्ट मधे आलीय.

पहिला - वस्त्र नसेल तर त्या ऐवजी पैसे ठेवा.(प्रिया चार आणे ठेवते.)

पहिला - चार आणे? पुढं वस्त्र किती तोकडी होणार आहेत त्याचं हे प्रतीकच आहे. (चार आणे खिशांत टाकतो.) इदं दानम्! दान ठेवा. हजार पाचशे रूपये.

दुसरा - दान कशा पायीं?

पहिला - पीडा निवारणार्थम् दानं.

दुसरा - (तिसऱ्याला) ठिव रे. आपल्या मागची पिडा सुटू दे येकदाची.

(दुसरा आणि तिसरा दान ठेवतात.पहिला पटकन् नोटा खिशात घालतो.)

दुसरा - नोटांवर पानी सोडायचं न्हाई वाटतं?

पहिला - खराब होतात. हं! सगळे जण हातात पाणी घ्या. प्रिया, तू त्याच्या (चौथ्याच्या) हाताला हात लाव.

प्रिया - छट्. मी त्याची लग्नाची बायको नाहीय्ये. (प्रिया चौथ्याचा कान पकडते.)

चौथा - (हात झिकारत) शिट्! इतक्या गंभीर प्रसंगी.....

प्रिया - परिस्थितीचं गांभिर्य जाणवलं म्हणायचं? (दूर जावून उभी राहते.) कर्म पुढं सुरुं करा.

पहिला - पाणी हातात घ्या. म्हणा... हे स्त्रिये स्वर्गं गच्छ, स्वर्गं गच्छ, स्वर्गं गच्छ!! पाणी खाली टाका.

चौथा - माझं आधीच गळून गेलंय्.

पहिला - पुन्हा पाणी घे आणि सोड खाली. चला. कर्म संपलेलं आहे.

दुसरा - अजंडा संपलेला आहे. हाऊस इज ॲडजरनूड्!!

तिसरा - मला भूक लागलीय्.

दुसरा - मला पन् तसंच वाटतंय्. पिरया बाई पानं मांडा. सराद्धाचं जेवन घाला.

पहिला - वाट बघा. तुम्ही सगळ्यांनी ब्रेड वर पाणी सोडलंय्. (ब्रेड खाऊ लागतो.)

चौथा - त्याची चाल आपल्या लक्षात आली नाही. करकोच्या सारखं बघत बसू नका. सार्वजनिक वितरण व्यवस्था-पीडीएस-सडते तेव्हा सामान्य माणसाला आपला हक्क जबरदस्तीनं मिळवावा लागतो. दुकानं फोडा, तांदुळ, साखर, चहा, तेल, जे हाताला लागेल ते ओरबाडून घ्या. घाबरुं नका. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.

प्रिया - आज काही पक्षश्रेष्ठींनी रेशनिंग दुकानं फोटा, तांदूळ, रवा, मैदा, साखर, चहा, डाळी या गरजेच्या वस्तूंपैकी जे जे हाताला लागेल ते लुटून असं आवाहन केलं आहे. अशी लुटालूट लोकशाहीला घातक आहे कां या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आपण काही विचारवंतांना आपल्या स्टुडिओत निमंत्रित केलं आहे. प्रेक्षकांचा काय प्रतिसाद मिळतोय तेही आपण तपासणर आहोत. मी सुरुवात करते आपल्या पहिल्या पाहुण्या पासून -

(त्याचवेळी रंगमंचावर चार चौकटी आणि त्या चौकटीत टांगलेल्या चार रंगाच्या चार टोप्या दिसू लागतात.)

प्रिया - आपलं काय मत आहे ?

पांढरी - ब्ला, ब्ला, ब्ला, ब्ला, ब्ला, ब्लाऽऽऽ

निळी टोपी- ब्लू... ब्लू... ब्लू.... ब्लूऽऽ.

तांबडी टोपी- ब्लो... ब्लो.... ब्लो.... ब्लो... ब्लो....

भगवी टोपी - ब्लै.... ब्लै.... ब्लै... ब्लै !

(ब्ला, ब्लू, ब्लो... ब्लैचा गलका वाढत जातो. प्रिया गलका बंद करते.)

प्रिया - या प्रश्नावर खूपच मतभेद आहेत असं वाटतंय. आम्ही व्हॉईस मेलवर दर्शकांची मतं मागितली होती त्यापैकी ९९.५ टक्के प्रेक्षकांचं मत आहे की जे सरकार किंवा विरोधक

भ्रष्टाचार किंवा काळाबाजाराला मोकळं रान करून देतं त्यांना लोकशाहीत स्थान नाही. या कार्यक्रमाचा अजून बराच वेळ शिल्लक आहे. तरी हा कार्यक्रम आम्ही इथंच आवरतां घेतो. पुढचा कार्यक्रम सुरु करण्यापूर्वी ऐका नटरंग सिनेमातलं गाणं 'वाजले की बारा'. (गाणं सुरुं होतं. क्षणभरानं)

प्रिया - (सगळ्यांच्यावर नजर फिरवून) मित्र हो, (सगळे सावरुन बसतात.) तुम्ही झोपायच्या तयारीत आहात. झोप लागेपर्यंत विचार करा, चिंतन करा-आपण इकडे कशासाठी आलो. माझ्या मते, सर्वच क्षेत्रातल्या ठोकळेबाज विचारसरणी पासून मुक्ति मिळवण्यासाठी आपण इतक्या दूर आलो आहोत, नवं काहीतरी शोधण्यासाठी आलो आहोत. त्या कार्यात मी तुम्हाला मदत करणार आहे. तसं कांही नवं सापडलं तरच तुम्ही पुन्हा जनतेचा विश्वास संपादन करु शकाल आणि नेतृत्व पुन्हा तुमच्याकडं चालत येईल. म्हणून विचार करा- लोकांना काय पाहिजे? सामान्य जनताही ठोकळेबाज विचारसरणीला कंटाळली असेल तर... जनतेला नवं काय हवंय्? लोकमताच्या या नाडीवर एकदा का आपण बोट ठेवलं.....

चौथा - (चादरी मागून) च्यायला, नाडी तुटली. प्रिया लवकर ये......

तिसरा - (स्वतःच्या नाडीवर बोट ठेवून) नाडीचे ठोके वाढत आहेत.

पहिला - भुकेल्या माणसांची नाडी सुकलेल्या पोटांत उडत असते. अशा जनतेची मागणी एकच- 'दोन वेळा पोटभर खायला द्या.'

दुसरा - (झोपल्या झोपल्या) डोस्कं टेकायला निवारा द्या. एक डोस्कं एक निवारा. (झोपतो.)

प्रिया - तुमच्या या मागण्यातूनच आपल्याला नवा मार्ग सापडेल.

चौथा - बंकूअप्! आपली जनता सेक्स स्टार्व्हड् आहे. लैंगिकतेचे भुकेले आहेत. मी त्यांचा प्रतिनिधी आहे. लवकर इकडं ये (प्रियाला पडद्यात खेचतो.)

तिसरा - सगळं उघड उघड बोलण्याची, करण्याची भिती कशी वाटत नाही या लोकांना?

(पहिला, दुसरा घोरत आहेत. चादरी मागून हसणं आणि प्रणय क्रिडेचे आवाज. तिसरा भयभीत नजरेनं इकडं तिकडं बघत राहतो. अंधार वाढत जातो. रातकिड्यांचा आवाज. कांही क्षणानंतर त्या आवाजात जंगली श्वापदांच्या आवाजाची भर पडते. तिसरा जास्तच भेदरलेला. त्याच क्षणी त्याच्या समोर मि. सिंग (डॅडी) त्यांच्या गळ्यात पाटी लटकते आहे. पाटीवर 'खरा वाघ' अशी अक्षरं लिहीली आहेत.)

तिसरा - (किंचाळतो) कोण आहेस?

वाघ - मी वाघ.

तिसरा - वाघ?

वाघ - आडनाव नाही, खराच वाघ. बघाना, गळ्यात तशी पाटी लटकवूनच मी फिरतोय्.

तिसरा - शिवाय बोलतोयूस सुद्धा!

वाघ - आम्ही पामर पशूंनी काय बोलावं? परी विश्वंभरे बोलविले. तशीच परिस्थिती निर्माण झालीय्! कुणासमोर तरी तोंड उघडल्याशिवाय पोट भरणार नाही.

तिसरा - तोंड उघडल्याशिवाय पोट भरत नाहीच!

वाघ - तेच सांगतोय्. जंगलं कमी होत आहेत. डुकरं, ससे, हरणं... सगळंच कमी होतय्. उपासमारीची पाळी आलिय्!

तिसरा - मग तू शाकाहारी हो!

वाघ - सगळी दुकानं केव्हाच लुटली गेली आहेत.

तिसरा - आता काय करायचा विचार आहे.

वाघ - विचार करतोय कि अशा दुष्काळी परिस्थितीत नरभक्षक व्हावं कां काय करावं?

तिसरा - नरभक्षक? म्हणजे तू मला........

वाघ - घाबरु नका. मी तुम्हाला खाणार नाही. तोबा, तोबा!! पशू असलो तरी शिक्षकाच्या नरडीचा घोट घेण्याचं पातक मी करणार नाही.

तिसरा - म्हणजे ?

वाघ - तुम्ही स्त्री असता तर शिक्षिकेच्या-मास्तरणीच्या नरडीचा घोट असं म्हटलं असतं!!

तिसरा - .... चालता होता इथून.

वाघ - गुरुदेव, लेकराला असं झिडकारुं नका. आम्ही बोलून चालून पशू. आहार, निद्रा, भय, मैथून, या चार विकारा शिवाय आम्हाला काही कळत नाही. तुम्ही माणसं हुशार. प्रत्येकाचं शास्त्र बनवलंत. म्हणूनच आपल्या पायाशी आलो. भूक लागली की नरडीचा घोट घेण्यापासून आम्हाला परावृत्त करणं कुणालाही शक्य नाही. आता पंचाईत झालीय्.

तिसरा - ते कळलं. माझ्याकडून काय हवंय्?

वाघ - माणसाच्या नरडीचा घोट घेऊन सुद्धा पोलिसांच्या किंवा जंगल अधिकाऱ्याच्या नजरेतून स्वतःला कसं वाचवायचं तेवढा कानमंत्र द्या. उपकार होतील लेकरावर.

तिसरा - त्यासाठी सत्ताधाऱ्यांचा सदैव पाठिंबा मिळवावा लागतो. सत्ता बदल झाला तर पक्षांतर करावं पण स्वतःचा जीव वाचवावा.

वाघ - चांगली कल्पना आहे. पक्षांतर!! (हसतो.)

(वाघाचं काम करणारा नट खिशातून खडू काढतो. वाघ हा शब्द पुसून तिथं 'सिंह' शब्द लिहीतो आणि हसत हसत निघून जातो.)

तिसरा - जीव वाचवण्यासाठी पक्षांतर करता येतं ही चाल विसरलोच होतो मी. पुढं काळ विचित्र येणार आहे. आजचे मित्र उद्या साथ देतीलच असं छातीठोकपणे सांगता येणार नाही. प्रिया त्यांना चौफर वाट मोकळी करून द्यायला निघाली आहे. दिवस उजाडायच्या सुमारास इथून

निघून जावं किंवा आताच यांना दिसणार नाही अशा एखाद्या उंच झाडाच्या शेंड्यावर चढून बसावं.

(पिशवी घेऊन रांगत रांगत डाव्या विंगकडून उजव्या विंगकडं लावू लागतो. या दरम्यान प्रिया आडोशाबाहेर येऊन उजव्या विंग जवळ उभी राहते. तिला बघून, ओशाळून तिसरा मागं फिरतो.)

प्रिया - घाबरून पळून चालला होतास? पळपुटेपणा करून प्रश्न सुटत नाहीत. त्या पेक्षा माझं ऐक. भिती सोड.

तिसरा - ते जमेल असं वाटत नाही.

प्रिया - प्रयत्न तर करून बघ!

तिसरा - खूप वेळा प्रयत्न केला. पण नाही जमत.

प्रिया - कां नाही जमत?

तिसरा - कां कुणास ठावूक! कदाचित् लहानपणा पासूनच माझी तशी वृत्ती झाली असेल. कदाचित फार प्राचीन काळापासून ही भीति माझा पाठलाग करीत असेल.

प्रिया - तुला नक्की कशाची भीति वाटते?

तिसरा - कशाचीहि.

प्रिया - ते कसं शक्य आहे?

तिसरा - माझ्या बाबतीत तेवढंच शक्य आहे.

प्रिया - पण अशा घाबरटपणामुळं प्रगति खुंटते हे तुला कळत कसं नाही? असं किती दिवस चालणार? तुझं पुढं कसं होणार?

तिसरा - हेच प्रश्न मी माझ्या मनाला असंख्य वेळा विचारलेंत. पण उत्तरं मिळली नाहीत. मग, 'उत्तरं न मिळणारे प्रश्न मनांत आलेच का,' या विचारानं मी अस्वस्थ होतो. मग मला माझ्या अस्तित्वाचीही भीति वाटायला लागते.

प्रिया - तुझ्या अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या विरुद्ध बंड करून उठावं असं वाटलं नाही तुला कधी?

तिसरा - (प्रचंड घाबरुन) बंद?..... मी करायचं?

प्रिया - ठीक आहे. तू करू नकोस. पण दुसरे कुणी पुढे सरसावले तर त्यांच्या आड येऊ नकोस.

तिसरा - मी कुणाच्या आड आलोय?

प्रिया - या तिघांच्या. त्यांना वाटतं कि त्यांना जे पाहिजे ते तुझ्यामुळं त्यांच्या पदरांत पडत नाही.

तिसरा - काय हवंय् त्यांना?

प्रिया - सुखाचा निर्भेळ आनंद. पण तू ऐनवेळी हातपाय गाळतोस. शंका कुशंका उपस्थित करतोस.

तिसरा - प्रिया, मला वाटत होतं, कि भित्रेपणामुळं स्थैर्य लाभतं, जेवढं मिळालंय् तेवढं टिकून राहतं. पण इतरांना ते मान्य नाही. प्रिया, मी इतका वाईट आहे?

प्रिया - रडूबाई आहेस. असं रडत बसण्यापेक्षा भीतिच्या पगड्यातून एकदा बाहेर पड.

तिसरा - दार बंद करून घराबाहेर पडण्या इतकं सोपं नाही ते.

प्रिया - हो अगदी तितकं सोपं आहे. म्हणजे काय करायचं कि स्वतःला काय पाहिजे त्याचाच विचार करायचा फक्त. बाकीचे सगळे विचार बाजूला सारायचे.

तिसरा - बाकीचे विचार? उदाहरणार्थ/

प्रिया - उदाहरणार्थ... माझ्याबद्दल काय वाटतं तुला?

तिसरा - तू एक स्त्री आहेस.

प्रिया - हे सांगायला तू कशाला पाहिजेस. चार सहा महिन्याचं पोर सुद्धा सांगेल.

तिसरा - तू एक सुंदर स्त्री आहेस.

प्रिया - शीः! किती पंडिती विधानं करतोयस. जरा मनापासून, काव्यमय भाषेत सांग.

तिसरा - अंऽऽ, काव्यमय भाषेत? हंऽ, तू निर्मितीचं सुंदर प्रतीक आहेस.

प्रिया - व्वा, क्या बात है! (लटक्या रागानं) पण त्याचा तुझ्यावर काही परिणाम आहे कां?

तिसरा - हो आहे! पण ...पण तुझा प्रियकर तिकडं झोपलाय्.

प्रिया - विश्वामित्रानं मेनकेला बघितलं तेव्हा इंद्राचा विचार केला होता का? नाही!

तिसरा - पण त्यांनी शकुंतलेच्या शोकांतिकेला जन्म दिला.

प्रिया - हेंच, हेच! बाकी सगळे विचार बाजूला ठेव. विचार कर फक्त माझा, माझ्या सौंदर्याचा, माझ्या निर्मिती शक्तीचा. ये. कदाचित् या क्षणापासून, या प्रयोगानंतर तू भयमुक्त होशील ये.ऽयेऽ.

(प्रियाच्या मागे पडद्या आड जातो. चौथ्याला लाथेनं दूर ढकलतो. तो गडगडत बाहेर येतो. मस्त संगीत सुरु होतं. हळू हळू अंधार. संगीत आणखी उन्मादक होतं जातं. काही भित्रे, काही भावुक आवाज. क्षणभरानं आवाज आणि संगीत बंद होतं. पूर्ण अंधार. अंधारातून तिसऱ्याचा आक्रोश.)

तिसरा - चांडाळा हे काय करून बसलास.

(दुसऱ्या दिवसाची सकाळ. उजेड येतो तसतसे एक एकजण आळोखे पिळोखे देत उठून बसतात. प्रिया मधेच केव्हातरी बाहेर आली आहे. पूर्ण उजेड. पडद्या आडून तिसरा बाहेर येतो. त्याच्या लेंग्याची नाडी लांबत आहे. सगळे हसूं दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. क्षणभरानं.)

चौथा - प्रिया, या जंगलात नक्की भुताटकी आहे. आपण दोघं पडद्यामागं झोपलो होतो आणि हे भेदरट इकडं. न कळत जागा कशा बदलल्या...

प्रिया - यानंच कांही तरी चेटूक केलं असणार.

तिसरा - प्रियाऽऽऽ!

प्रिया - माझ्यावर गुर्गुरु नकोस. काय झालं ते फक्त वर्णन करुन सांगतीय् मी! हे दोघं इथं झोपले. आपण दोघं...इश्शऽ! नंतर तूहि झोपलास. पण हा टक्क् जागा होता. मी पण अर्धवट जागी होते. ऐकत होते. अरे, हा चक्क वाघाशी बोलत होता, न घाबरता! मात्र गप्पा वगैरे मारुन झाल्यावर याची सटारली. पडद्यात शिरुन आपल्या दोघांच्या मधे घुसला. तुला उठवायचा प्रयत्न केला. पण तुझी ब्रह्मानंदी टाळी लागली होती. मग तुला लाथेनं बाहेर ढकललं आणि मी पण इकडे येऊन झोपले.

तिसरा - अश्शी मजा झाली! (हसतो)

(त्याचं हसणं ऐकून इतर सगळे हसतात. प्रिया एकाएकी गंभीर होते.)

प्रिया - दात विचकून हसू नका. इथं टूथपेस्टच्या जाहिरातीचं शूटिंग चाललेलं नाही. जा. तोंड धुवून या.

(पहिला, तिसरा जातात. दुसरा-वॉटर बॅगमधल्या पाण्यानं दोन चुळा भरतो.)

दुसरा - मंडळी, तुमास्नी जायचं असेल तर जावा. म्या हाय हितं राखण करायला.
(आडवा होतो.)

प्रिया - शीऽ, घाणेरडा! (चौथा आणि प्रिया जाऊ लागतात. प्रिया मागं वळून.) तू झोपून राखण करणार. त्यापेक्षा आम्ही परत येईपर्यंत चहा करून ठेव. (दोघं जातात.)

दुसरा - च्या! जंगलात? पिरयाऽऽऽ, च्या चं सामान आनलंय का?

प्रिया - (आतून) माझ्या बॅगमधे आहेऽ!

दुसरा - (प्रियाच्या बॅगमधे शोधाशोध करतो. सापडत नाही.) च्याचं सामान, कुट ठिवलंय? माजं डोस्कं पन् काम करेनासं झालंय्. भूक लागल्या सारकी वाटतीय्. वाटनारच्. काल

रातच्याला काई खाल्लं न्हाई. काय खानार? बामणी राजकारनाचा हिसका बसलाच! डबल रोटीवर पानी सोडा म्हनाला. आमी सोडल. आता झाडपाला खा. (बोलत बोलत एका झाडापर्यंत जातो. त्या झाडाची दोन-चार पानं तोडतो. बोटावर चुरगाळतो. वास घेतो.) व्वाऽ! काय मस्त वास हाय्! बकुळाच्या व्हटाच्या पाकळ्यांना असाच वास येतुया. (पाल्याची गोळी खातो.) च्या मायला, चव पन ग्वॉड हाय्. (आणखी चार-पाच पान खातो. नंतर त्याच्या चालण्या बोलण्यात फरक पडतो.) चीऽभनं! मला एकायेकी काय व्हाया लागलं? कानशिलं गरम व्हतायत्, शीर आन् शीर ताठ व्हायला लागलीय्! धेवाऽ, या पाल्याचा खुराक आधीच माज्या नशिबी लिवला असतास तर न माजी बायकू पळून गेली असती; ना म्या त्या मास्तरणीच्या मागं लागलो असतो...... आज येक जडीबुट्टी माज्या हाती लागली. भोवतालच्या नामर्द लोकांना ह्यो पाला खायला घालून माजं गुलाम बनवतो. सत्ता टिकवन्याची चांगली आयडिया हाय्. (बोलत बोलत प्रियाच्या बॅगेजवळ येतो. पुन्हा शोधतो. चहाच्या सामाना ऐवजी, घड्याळाच्या पट्यात अडकून प्रियाची ब्रा बाहेर येते. दुसरा त्याच्याकडं टक लावून बघतो. त्याच वेळी प्रिया प्रवेश करते.

प्रिया - काय चाललंय?

दुसरा - काय बी न्हाई. अवो असल्या सामानात अडकलं कि मनावर निरोध बसत न्हाई!

(प्रिया हसत हसत डाव्या विंगमधे जाते. दुसरापण तिच्या मागं जातो. नंतर ज्या झाडाचा पाला त्यानं खाल्ला होता त्या झाडावर प्रकाश केंद्रित होतो.)

दुसरा - (आतून) पिरया बाई त्या तिघास्नी झऱ्यावर सोडून आलात?

प्रिया - (आतून) हो. सगळ्यांना गुंगारा देवून तुझ्यासाठी आले.

दुसरा - त्यांना काय सांगितलंत?

प्रिया - सांगितलं... मला आवडेल इतकं स्वच्छ तोंड धुतल्याशिवाय कॅंपवर परत यायचं नाही. बसले असतील विटकरानं तोंड घासत!

दुसरा - म्या प क्स्त वाटर बॅग मधल्या पान्यानं चुळा भरल्या व्हत्या. तुला चालंल?

प्रिया - सभापती अहोऽ, कावळ्याच्या विष्ठेतून बीज पडलं तरी त्याला सामावून घेऊन नवा अंकुर देणारी माती जितकी उदार असते तितकीच मी पण उदार मतवादी आहे.

(दोघांच्या हसण्याचा आवाज. झाडावरचा प्रकाश आणखी केंद्रित होतो. थोडं संगीत आणि कावळ्याची जास्तच काव् काव् ऐकू येते. क्षणभरानं सगळं शांत. नंतर रंगमंचावर पूर्ण प्रकाश. प्रिया प्रवेश करत. शेकोटीजवळ बसते. पाठोपाठ दुसरा प्रवेश करतो. प्रियाच्या पायाशी झोपतो. प्रिया हसते आहे. आणखी काही क्षणानंतर इतर तिथं प्रवेश करतात. त्यांच्यापैकी पहिला आणि चौथा यांची तोंडं लालभडक दिसत आहेत. तिसरा आणि चौथा प्रियाच्या जवळपास बसतात. पहिला जरा घुश्श्यात आहे. थोडा दूर जावून बसतो.)

प्रिया - त्याला रुसायला काय झालं?

तिसरा - दोघं जण भांडले.

प्रिया - कारण?

तिसरा - चेहऱ्याचा उजवा भाग लाल करायचा का डावा भाग या मुद्यावर भांडले.

प्रिया - चेहरा एकच आहे. डाव्या उजव्या भागानं काय प रक पडतो?

पहिला - प ोटो काढलात तर प रक कळेल. राइट प्रोप ाइल अँड लेफ्ट प्रोप ाईल इज नॉट द सेम!! मला उजव्या दाढेनं काहीच खाता येत नाही.

चौथा - सो इज द केस वुइथ मी!! माझ्या डाव्या बाजूला एखादी स्त्री....नो. आय कांट कन्व्हिन्स हर अनलेस शी कमस् टु माय राइट....

तिसरा - वेडे आहात. उजव्या डाव्याचं भांडण सुरु करून स्वतःला रक्तबंबाळ करून घेण्याचा असला आत्मघातकीपणा......

पहिला - आत्मघातकीपणा? अन्नाला महाग झालो तरी गप्प बसायचं?

चौथा - मुलायम शय्या सोडून काट्यात झोपण्याची वेळ आली तरी गप्प बसायचं?

दुसरा - न्हाई. जनता पुना आपल्या मागं येईल असं काईतरी नवीन शोधाया हवं. पिरया बाई, कावळ्याच्या गुवातनं पडलेल्या बी चं पन् झाड व्हतं असं तू म्हनालीस तर तूच आता आमाला नवी दिशा दाखव.

प्रिया - सगळ्यांच्या वतीनं बोलण्या येवढा अधिकार तुला आहे?

दुसरा - च्यायला सभापती करून आमचा मताधिकारच वरबाडून घेतलायूत ठीक हाय. भऊमतानं ठरलं त्येच आमचं मत.

चौथा - मलापण तू सांगशील ते मान्य आहे.

तिसरा - मी केव्हाच हो म्हटलंय्! (प्रिया पहिल्याकडं बघते.)

पहिला - तू काय करणार आहेस ते कळल्याशिवाय मी माझं मत सांगणार नाही.

प्रिया - हं! (क्षणभर प्रचंड स्तब्धता) पहिली गोष्ट दोघा तिघांनी गावांत जायचं.

चौथा - तुम्ही तिघांनी.

प्रिया - (पहिल्याजवळ जाते.) नाही. हा आणि मी इथं राहणार आहोत. तुम्ही तिघांनी गावात जायचं. (चौथ्याला) तू आपल्याला काही दिवस पुरतील इतके खाण्यापिण्याचे जिन्नस घेऊन ये. (तिसऱ्याला) तू दोन तंबू आणि पाच कॅंप् कॉटस्, गाद्या, उशा वगैरे आण.

दुसरा - त्याची वेवस्था म्या बरुबर करीन.

प्रिया - नाही त्यालाच करू दे. तू गावांत हिंडून लोक तुमच्याबद्दल काय बोलतात त्यांचा अंदाज घे.

दुसरा - पन् मी एकटाच लोकांच्या समोर जायच म्हंजी ताबडतोब वळखतील!

प्रिया - वेश पालटून जा.

दुसरा - तरी बी वळखलं त्यांनी कि काईतरी शिजतंय् तर?....

प्रिया - तर सांग, हायकमांडशी चर्चा करण्यासाठी गेलो होतो. रात्री फ्लाइटनं पुन्हा जाणार आहे.

चौथा - विमानानं जातोय् असं सांगून इकडे यायचं चालत.

प्रिया - तू कित्ती हुशार आहेस. (तिसरा) डार्लिंग, तुला काही शंका.....

तिसरा - मला डार्लिंग म्हणू नको.

प्रिया - कां?

चौथा - तो शब्द अश्लील आहे. त्याला लिंग चिकटलंय्. डार्-लिंग.

प्रिया - ठीक आहे राजा म्हणते. माझ्या राजा, काही शंका? नाहीत? व्हेरी गुड्. चला. पटापट कामाला लागा.

(दुसरा तिसरा जातात. चौथा मागं घुटमळतो.)

प्रिया - तूं का घुटमळतो आहेस?

चौथा - प्रिया, कॅन आय नो, हे सगळं काय चाललं आहे?

प्रिया - 'बाई' या विषयातला दर्दी तू. एका बाईच्या मनांतली खळबळ तुला कळली नाही? (हसते.) मी स्वप्न बघतीय. तुम्हाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं समाज स्वप्न. देश, धर्म, संस्कृती, नियमावली या शब्दांचं अजस्त्र धूड लाखो, हजारो वर्षं तुमच्या छाताडावर नाचतंय्. त्या गोळ्याच्या गुदमरून टाकणाऱ्या वजना खालून तुम्हाला बाहेर काढून एक-

एक कातीव व्यक्तिमत्व देण्याचं स्वप्न, आणि त्या प्रक्रियतून नव्या नेतृत्वाला जन्म देण्याचं स्वप्न!

चौथा - आय्.सी. म्हणजे माझ्या मुलाला जन्म देणार?

प्रिया - तुझ्याच मुलाला कशावरून? मूळ कुणाचं ते काळच ठरवील.

चौथा - बदफ्ली पणाची कबुली देताना लाज वाटायला पाहिजे तुला.

प्रिया - लाज? आय्.ॲम ए फ्री लान्सर, तुझी लग्नाचो बायको नाहीय्ये मी. आणि एक गोष्ट लक्षात ठेव नवं काहीतरी व्हावं ही माझी इच्छा आहे. तू फक्त निमित्त आहेस. गेट आऊट!

चौथा - अस्सं? बघून घेईन. (जातो. प्रिया पहिल्याकडं वळते.)

प्रिया - नुसता बसून काय राहिलास?

पहिला - मग काय करूं?

प्रिया - आम्ही काय बोलत होतो ते ऐकलं नाहीस?

पहिला - ऐकलं! पण उपयोग काय?

प्रिया - तू आक्रमक कां होत नाहीस?

पहिला - सगळी आक्रमणं पोट भरल्यानंतरची असतात. अर्धपोटी गरीब युगानुयुगं तसाच राहणार आहे. भुकेच्या व्यथेचं निमित्त करून तू आणखी एका चिरक्या आवाजाला जन्म देशोल.....

प्रिया - अशक्य. तू एकदा आवाज बुलंद कर आणि मग गम्मत बघ. ऊठ.

पहिला - नाही.

प्रिया - ऊठ म्हणते ना,

(तो हलत नाही. प्रिया त्याच्या कमरेत लाथ घालते. तो उठून पळून जाण्याचा प्रयत्न करतो. प्रिया त्याला ओढत ओढत डाव्या विंगेमधे घेऊन जाते. पहिला दबक्या आवाजात, 'नको, नको' अशी कुरकुर करत राहतो. प्रिया खळखळून हसत राहते. प्रकाश हळूं हळूं कमी होत जातो. अंधार!

हळूं हळूं उजेड. प्रिया प्रवेश करते. समाधानानं हसत आहे. हसतां हसतां एकदम गप्प होते. कुठून तरी येणाऱ्या आवाजाचा वेध घेते. गाण्याचा आवाज असावा. त्या आवाजात आपला स्वर मिसळण्याचा प्रयत्न करते. क्षणभरानं -)

प्रिया - कोण गातंय्?

आवाज - मी ..... अनाहत.

प्रिया - समोर ये ना!

आवाज - समोर न येताच मी तुझ्या रोमारोमाला स्पर्श करतोय्.

प्रिया - कशासाठी?

आवाज - तुझा प्रयोग खऱ्या अर्थानं यशस्वी करण्यासाठी.

प्रिया - म्हणजे काय?

आवाज - म्हणजे-माझा अंश तुझ्या गर्भात साठवून घे. त्याशिवाय तुझ्या पोटीं जन्माला येणारा जीव माणूस म्हणून ओळखला जाणार नाही.

प्रिया - (हेटाळणीच्या स्वरात) चल्. काहीतरी सांगू नकोस.

आवाज - काहीतरी नाही, शास्त्रीय सत्य सांगतोय्. पृथ्वी सूर्यापासून वेगळी झाली. स्वतःभोवती गिरक्या घेऊ लागली. त्या क्षणी हा नाद आणि ताल सुरु झाला. हा ताल आणि नाद प्रत्येक कणाकणात भरलेला आहे, कारण प्रत्येक कण पृथ्वीबरोबर फिरतो आहे.

प्रिया - मग आजच मला तुझं अस्तित्व कां जाणवलं?

आवाज -	कालपर्यंत जाणवलं नाही म्हणून!

प्रिया -	चल्. मला शड्या लावू नकोस!

(प्रिया स्वतःभोवती दोन तीन गिरक्या घेते. त्या गिरक्यातून, तिच्या कपड्यातून एक प्रकारचा नाद तयार होतोय असं तिला वाटतं. ती संबंध स्टेजवर नाचते. ओटीपोटावर हात ठेवून नाचते. काही क्षणानंतर नाचत नाचतच बाहेर जाते. ढगांचा गडगडाट, विजा...नंतर ऋतू बदलाचे ध्वनि संकेत. प्रकाश येतो. क्षणभरानं प्रिया प्रवेश करते. आता ती अवघडलेली आहे. शेकोटी शेजारी बसते. लाकडाची मोळी घेऊन पहिला प्रवेश करतो.)

पहिला -	प्रिया, खूप त्रास होतोय्?

प्रिया -	त्रास कसला. समोर येणारा प्रत्येक क्षण म्हणजे जगण्याचा एक प्रयोग आहे. एक्स्पेरिमेंट इन लिव्हिंग असा मनाशी निश्चय केला कि कसलाच त्रास होत नाही.

पहिला -	तुझ्या चेहऱ्यावरून मात्र वाटतंय् कि तू थकली आहेस, तुला त्रास होतोय.

प्रिया -	त्रास नाही पण मला भीति वाटतीय् मूल जन्माला आल्यावर तुम्ही माझ्याशी आणि त्याच्याशी कसे वागाल?

पहिला -	नऊ महिने चांगले वागलो ना? सामान सुमान आणायला गेलेली ही मंडळी परत कशी आली नाहीत.

प्रिया -	विषय बदलू नकोस. एक सांग. मूल तुझ्या वळणावर गेलं नाही तर तू काय करशील?

पहिला -	तसं होणच शक्य नाही. अँड् डोंट बी अ रिएक्शनरी.

चौथा -	(प्रवेश करून) ऑल आर ब्लडी रिएक्शनरीज्!!

(पाठोपाठ दुसरा, तिसरा प्रवेश करतात. सोईस्कर जागी बसतात.)

प्रिया -	(चौथ्याला) खायला काय आणलंस?

चौथा - लंचसाठी साबुदाणावडे आणि डिनरसाठी साबुदाणा खिचडी.

पहिला - म्हणजे काय चिकन, मटन मिळालंच नाही?

चौथा - आख्या गावानं आज एव ादशीचा उपास केला

पहिला - उपास करतात, बूर्झ्वा सालेऽ!

प्रिया - चिडू नको. ती एक चांगली अर्थशास्त्रीय कल्पना आहे. इफ् यू कॅनॉट इन्क्रीज प्रॉडक्शन, डिक्रीज द कन्झमशन! उपास करा. (हसते) तू काय पाहिलंस?

तिसरा - गांव नऊ वाजतां झोपतं. पहाटे पाच वाजतां उठतं.

प्रिया - निसर्गाशी जडलेल्या सवयी. (दुसऱ्याला) तू काय ऐकलंस?

दुसरा - लोक पुन्हा आपल्याबद्दल बरं बोलू लागल्यात. म्हनतात, झाली तेवडी शिक्षा पुरं जाली. न्हाई म्हनायला दोन चार इरोधी तोंडं बोलत्यात....

प्रिया - तीहि बंद करू.

पहिला - उपासाचं काय्?

चौथा - रात्री नऊ वाजता झोपण्याचं काय?

प्रिया - हळू हळू सगळं बदलू.

सगळे - हळू हळू कां?

तिसरा - ती सांगेल तसं करायचं ठरलं होतं. मग उतावळे होऊ नका. मला तर भीति वाटतेय्... लोकांना बदल नको असतात. अचानक झालेल्या परिवर्तनाची तर त्यांना प्रचंड भिती असते.

दुसरा - इची भनं, भिती! .... गाडून टाका तिला.

चौथा - कुठून सुरु झाली ती भीतीची परंपरा?

पहिला - खून करा त्या परंपरेचा. (तिघं तिसऱ्याला घेरतात.)

तिसरा - नाही मला मारु नका. मी मेलो तर तुम्ही बेबंद कारभार कराल. एकमेकाशी पटायचं नाही तुमचं. नगरपालिकेला तीन दिशेला ओढून ताणून छिन्न विच्छिन्न कराल, एकाच शरीराच्या प ाकळ्या कराल.

(तिघं क्रूर हास्य करतात. तिसऱ्याला गळा दाबून मारुन टाकतात.)

चौथा - शालिनीला गाडून टाकली होती तिथंच पुरून टाका ते प्रेत.

पहिला - तेवढीहि लायकी नाही साल्याची. कॅम्पच्या मागं नेवून टाक्. वाघ, सिंह प ाडून खावू दे त्याला. (तिघं प्रेत उचलून उजव्या विंगमधे जातात. काही क्षणानंतर हसत हसत परत प्रवेश करतात.)

पहिला - याचं श्राद्ध वगैरे करायचं नाही नां?

चौथा - छट्!

दुसरा - तुजी तुमडी भरायला आता माज्याकडं पैसा न्हाई. (पोटात कळ आल्यामुळ प्रिया किंचाळते. तिघं तिच्याकडं जातात.)

चौथा - प्रिया काय झालं?

प्रिया - दिवस भरत आलेत. (तिघं तिच्या पायावर लोळण घेतात.)

प्रिया - हे काय चाललंय् तुम्ही?

तिघं - (गातात) जो तो वंदन करी उगवत्या । जो तो पाठ पि रवी मावळत्या ।।

प्रिया - पोरकटपणा पुरे काय!

तिघं - (डिस्कोच्या तालावर नाचतात,गातात.) हम तीनो । तीनोने मिलकर । दे दिया । कुछ नया । इस दुनिया को । डिस्को ओ डिस्को ।

प्रिया - (किंचाळून) नोऽऽऽ! (नाच गाणं एकदम बंद) नवीन देणार आहे ते मी. माझी मर्जी म्हणून. चालते व्हा, चालते व्हा. मला तुमची भिती वाटायला लागलीय्!

दुसरा - हिला येकायेकी काय झालं? आमचं भ्या वाटतंय्? भितीला गाडून टाकलं तरी? इची भनं, बायकाच पुना पुना भितीला जनम घेतात.(प्रियाचे केस धरून) हलकट रांड! मला वचन दिलंस आन् त्या मुडद्याचं प्वार जल्माला घालनार ?

पहिला- काय? तुला वचन दिलं. (उरलेल्या केसांच्या बटा धरून) सांग त्यांना, तू माझ्या मुलाला जन्म देणार आहेस.

चौथा - यू बिच् (प्रियाचा हात पिरगळतो) माझ्याच मुलाला जन्म द्यावा लागेल.

(प्रिया दुसऱ्याच्या डोळ्यावर थप्पड मारते, पहिल्याच्या पोटात गुद्दा मारते, चौथ्याच्या कमरेत लाथ घालते. तिघं दर् सरकतात.)

प्रिया - कुत्र्यांनो, पुरुषी अधिकार गाजवाल तर आत्ताच्या आत्ता गर्भपात करीन.

पहिला - गर्भपात? (हसतो) दिवस भरलेत. सामान्य बाई प्रमाणं मुकाट्यानं आडोशाला जाऊन बाळंत हो.

चौथा - जा म्हटलं ना?

(प्रियाच्या पोटात पुन्हा कळ येते. दुसरा तिला सावरतो.)

दुसरा - जावा. तंबूत जाऊन शान डिलीवरी करा.

(पियाला तंबूपर्यंत पोहोचवून परत येतो. आडवा होतो. पहिला आणि चौथा आपापल्या पिशव्यातून दुर्बिणी काढतात. प्रिया गेली त्या बाजूला बघत राहतात. प्रियाचं विव्हळणं. घड्याळाची टिक् टिक्.)

दुसरा - रात्री बारा वाजता डिलिवरी जाली तरी मला फोन करून उठवा बरं का!

पहिला - च्यायला, प्रिया हे एक कोडं आहे. बेशुद्ध न होता बाळंत होतीय्.

चौथा - हं! कोडं हळू हळू उलगडतंय्! नाळ स्वतःच कापली.(मुलाच्या रडण्याचा आवाज)

चौथा - मिस्टर प्रेसिडेंट.

पहिला - सभापती महोदय. (जवळ जावून त्याला हलवतो.) सभापती महाराज, फोन वाजतोय्. उचला.( दुसरा पहिल्याचा हात धरून आपल्या कानावर ठेवतो.)

दुसरा - हॅलो? कोन बोलतंय्?

पहिला- मी.

दुसरा - कुठून बोलतोयस्?

पहिला - जंगलातून!

दुसरा - काय झालं? लाकडाचा ट्रक पकडला? भडव्या, रजरच्या हातावर हिरवी नोट टिकंव.

पहिला - ट्रक मोकळा झालाय्.

दुसरा - किती मागतुया?

पहिला - भानावर या. प्रियाला मुलगा झालाय. पहिल्याच दिवशी तो काय मागणार?

चौथा - (ओरडून) त्याला पाहिजे ते मिळाले.

(पहिला, दुसरा दुर्बिणी लावून बघतात. आता तिघं एका ओळीत उभे आहेत. बघत आहेत.)

पहिला - बघितलंत? प्रियानं मुलाला पाजायला घेतलंय.

चौथा - एक दिवसाचं चिमुरडं पोर. पण दुसऱ्या हातानं काय करतंय् बघा. त्याचाच अर्थ, कामवासना जन्मपासून असते.

दुसरा - वाऽरं गबरु. त्यो माजी गादी चालवणार. डोळं कसं मिटून घेतल्येत बगाऽ!

पहिला - डोळ्याचं सोड. त्याचं तोंड किती प्रचंड आहे. प्रियाच्या पदरांत मावत नाहीय्ये! ती त्याच्याशी काही बोलतीय् का रेऽऽ?

चौथा - आत्तापासून आपल्याविरुद्ध पि तवत असेल.

दुसरा - गप्. ऐकूया!

चौथा - मला माहीत आहे ती पोराला काय सांगत आहे.

दुसरा - काय?

चौथा - तुझ्या माझ्या आईनं आपल्याला सांगितलं तेच.

दुसरा - मला न्हाई तसं वाटंत.

चौथा - व्हॉट नॉन्सेन्स. तिला भिती वाटायला लागलीय्. म्हणूनच प्रश्न निर्माण झालाय् आपण या पुढंही तिच्या मर्जीप्रमाणं वागत राहणार?

दुसरा - मरजी बिरजीचा प्रस्न न्हाई. पन् माज्या पोराची आय् हाय्! नांदवली पायजे. शिवाय झोपेत हात डावीकडं पडला तर हाताला ऊब देनारी कुनीतरी असलेली बरी!

चौथा - म्हणजे तू शेपूट घालणार!

दुसरा - अरं हट्! काय करायचं त्ये भऊमतानं ठरवूया. (पहिल्याला) एऽ, माज्या तोंडाकडं बघत बसू नकोस. ठराव मांड, ठराव मांड!!

पहिला - ही सभा बहुमतानं ठरवते आहे कि आता प्रियाची गरज उरलेली नाही. सबब ‘जिथं आहे, जशी आहे’ या तत्वावर तिचा लिलाव करण्यात यावा.

(दुपट्यात गुंडाळलेलं मूल घेऊन प्रिया प्रवेश करते. तिघं आळीपाळीनं प्रियाच्या मागं जातात, मुलाला बघतात. हताश होऊन, काहीसं चिडून तिघं एका कोपऱ्यात एकत्र येतात.

पहिला - सालीनं पसवलं. दुर्बिणीतून बघितलं म्हणून तोंड मोठ्ठं दिसलं.

दुसरा - तिच्या मायला, प द पि तुरी बाळंतिणीच्या खोली पोत्तार पोचली. वाटलं होतं, गुमान झोपला असंल्. पन् बघतोय तर काय तिच्या आयचं बेणंऽ, लुकलुकत्या डोळ्यानं झाडाच्या शेंड्याकडं बघत व्हता.

चौथा - मी आत्ता काहीच बोलत नाही. त्याला वयात येऊ दे. तात्पर्य-

पहिला - प्रियानं मला प सवलं.

दुसरा - सालीनं प द पि तुरी केली.

चौथा - प्रिया रांड आहे.

(तिघं काहीतरी खलबत करतात. नंतर 'ठरलं' असं म्हणून एकमेकाला टाळी देतात.)

प्रिया - ते तर नऊ महिन्यांपूर्वीच ठरलं होतं. आवरा आवरी करा. आपण परत जाऊ.

चौथा - हो निघायचंच. तू तुझं सामान आवर. तो पर्यंत मुलाला माझ्याकडं दे.

दुसरा - मूल माज्याकडं द्यायचं बगा!

पहिला - नाऽही! माझ्याकडे!

(प्रिया घाबरलेली. ती पळून जाऊ नये म्हणून तिघं तिला घेरतात. पहिला मूल हिसकावून घेतो. डाव्या विंगमधे दिसेनासा होतो. पहिला आणि चौथा प्रियाला ठोसे मारुन घायाळ करतात. ती कोलमडते. सामानसुमान गुंडाळून तिघं मुलासकट पळ काढण्यार तेवढ्यात तिसरा कडमडत येऊन स्टजवर पडतो. मुलाला घेऊन पहिला परत विंगमधे गायब होतो. मुलाला आत ठेवून परत येतो.)

दुसरा - कोन रं तू? (निरखून बघतो.)आंऽऽ तू अजून जिता हैस!

तिसरा - हो, मी मेलो नव्हतोच! तुम्ही गळा धरल्यावर मरणाच्या नुसत्या कल्पनेनं बेशुद्ध पडलो होतो. गळ्यावर तुमच्या नखांच्या जखमा होत्या. पण सिंहराजांनी चाटून चाटून त्या जखमा बऱ्या केल्या.

चौथा - भेकडांच्या जखमा चाटायच्या आणि उर्मटांच्या नरडीचा घोट घ्यायचा हे तंत्र अवलंबिल्याशिवाय शासन यशस्वी होऊ शकत नाही हा धडा आता तरी नीट शिका सिंहाकडून.

दुसरा - तिच्या मायला! जनावराकडनं धडे शिकायचे. कोन लागून गेला हा शिंव्ह?

(आतून सिंह गर्जना)

तिसरा - ते बघा आलेच सिंहराज. आणि एक गोष्ट लक्षात ठेव. त्याचा जनावर असा पुन्हा उल्लेख करु नको. आय्.ए.एस्. .... इंद्र चरण सिंह आहेत ते.

(सिंह प्रवेश करतो. आता त्याच्या गळ्यात पाटी आहे 'खरा नरसिंह')

दुसरा - अरं पन् म्या म्हंतो कि ह्ये कसलं लचांड मधिच उपटलय्?

सिंह - लचांड नाही? मी सिंह. या जंगलाचा राजा. माझ्या पहिल्या एंट्रीच्या वेळी तुमची माझी भेट झाली नाही. कदाचित् तुम्ही झोपला असाल.

तिसरा - सिंहराज हेच ते तिथं ज्यांनी मला मारण्याचा प्रयत्न केला.

सिंह - अच्छा!

चौथा - अच्छा. म्हणजे वाघाचे सिंह आणि सिंहाचे नरसिंह असं पक्षांतर करणारे तुम्हीच ते वात्रट वाघ?

सिंह - पक्षांतर नव्हे, रूपांतर. पूर्वीच्या पदावर परतण्याचा मार्ग बंद होतो. डायरेक्टर आमच्या खिशातून खडू काढूनच घेतो!! एनी वे ग्लॅड टु मीट यु ऑल.

चौथा - ओळख करून देतो.

सिंह - कांही गरज नाही. इकडं येता येतां गुरुदेवांनी सगळं सांगितलं मला. (पुढं होऊन चौथ्याशी शेकहॅंड करतो. दुसऱ्याजवळ जातो. दुसरा नमस्कार करतो.)

सिंह - तुम्ही या सगळ्यांचे लीडर वाटतं. नमस्कार केलात म्हणून ओळखलं तरो. पन् कारं भडव्या, हातात हात दिलास तर तुज्या शाण्णव पिढ्या बाटतील कारं? कर हात पुढं.

(दुसरा मुकाट्यानं हात पुढं करतो. सिंह नमस्कार करतो. सिंह जवळ यायच्या आधीच पहिला पुढं होऊन सिंहाशी शेकहँड करतो.)

सिंह - (स्वतःच्या हाताचा वास घेऊन-पहिल्याला) शीः! काय काय खातारे? सडलेल्या पाव-भाजीचा वास येतोय!

पहिला - (स्वतःच्या हाताचा वास घेऊन) पण तुमच्यामुळं माझ्या हाताला रक्त मांसाचा किती झकास वास येतोय्! (सिंह आपला हात दुसऱ्याच्या शर्टाला पुसतो.)

दुसरा - (संतापून) तिच्या मायला, आता मातर ह्ये ... ह्ये काय चाललंय्?

चौथा - (दुसऱ्याला) आय् थिंक, इट वुड् बी बेटर इफ्-तू या सगळ्या प्रकाराकडं डाळेझाक करावीस! (दुसरा डोळे झाक करतो.) सिंहराज, तुमची ओळख झाली हे फार बरं झालं. आपण पुन्हा भेटूच. सध्या आम्ही गडबडीत आहोत. आम्हाला निरोप द्या.

सिंह - निरोप ? शहराकडे निघालात ना ? मग सगळे एकदमच जाऊ या.

चौथा - सगळे?

सिंह - हो. गुरुदेव, तुम्ही तिघ, गुरुपत्नी...... प्रियाजी कुठायत्?

(इतका वेळ, सिंह, तिसरा आणि प्रिया यांच्यामधे फळो सारखे उभे असलेले तिघं दूर होतात. तिसरा वेगानं प्रियाच्या जवळ जातो.)

तिसरा - प्रियाऽऽ, प्रियाऽऽऽ तू ठीक आहेस ना? सिंहराज, शेवटी माझी भिती खरी ठरली. या तिघांनी माझा जीव घेण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांनी आपला मोहरा प्रियाकडं वळवला.

प्रिया - (पुढं सरसावून) हलकट, मुजोर सालेऽऽऽ! माझ्यावरच उलटले. माझ्या मुलाला घेऊन पळून जाणार होते.

तिसरा - प्रिया, मला ओळखलं नाहीस?

प्रिया - तू? जिवंत आहेस? आणि मला प्रिया म्हणतांना तुला भिती वाटली नाही?

तिसरा - नाही. कारण माझ्या पाठीशी आता सिंहराज आहेत. प्रिया, त्या तिघांनी आपल्या मुलाला तंबूत लपवून ठेवलं आहे.

प्रिया - आपल्या मुलाला? मिस्टर, ती फक्त माझी निर्मिती आहे.

पहिला - तो माझा मुलगा आहे.

दुसरा - माजा हाय!

चौथा - माझ्याशिवाय तो कुणाचाच असू शकत नाही.

सिंह - तुम्ही माणसं म्हणजे गाढवच आहात. मूल झाल्यावर ते कुणाचं, कुणाच्या वळणावर गेलंय् असले मुद्दे उपस्थित करून भांडत बसता! आमच्या जातीत भांडण झालं तर ते गर्भदाना आधी. नंतर मुलगी झाली तर आई सारखी. मुलगा झाला तर बापासारखा. सौंदर्याची आणि कर्तृत्वाची परिमाणं स्टँडर्डस् सुद्धा ठरून गेलेली असतात !!

चौथा - आमची तुमच्याशी तुलना करणं चूक आहे.

सिंह - मी तुलना केली नाहीच. फक्त दोन प्रोसेसस् मधला फरक दाखवून दिला. तोही एका हेतूनं कि त्यातून धडा घेऊन तुम्ही भांडण थांबवावं. जंगलातली शांतता बिघडू नये एवढी खबरदारी मला घेतलीच पाहिजे.

प्रिया - सिंहराज माझा हक्क मला मिळवून दिलात तर शांतता बिघडणार नाही.

सिंह - कसला हक्क ?

प्रिया - माझ्या मुलावरचा आणि माझ्या मर्जीप्रमाणं त्याला वाढवण्याचा हक्क! त्यांनी मूळ माझ्याकडून हिसकावून घेतलंय्!

सिंह - तुम्हा तिघांना वेड लागलंय् कां? मूल हिरावून घेतलं तर स्त्री किंवा सिंहीण किती राडा करते ठावूक नाही तुम्हाला? तिचं मूल देऊन टाका मुकाट्यानं!

चौथा - सिंहराज, थोडा गोंधळ होतोय्. यूसी, युवर लॉज् आणि ह्यूमन लॉज.....

सिंह - ठीक आहे. माझ्या राज्यात आहात आणि माणसं आहात म्हणून तुमच्या कायद्याप्रमाणं प्रश्न सोडवण्याची एक संधी मी तुम्हाला देतो. गुरुदेव, मानवी मुलाचा चेहरा मोहरा स्पष्ट व्हायला सात आठ महिने लागतात. असं ऐकलं होतं.

तिसरा - खरं आहे ते.

सिंह - मग तेवढा वेळ देतो. त्यानंतरही तडजोड झाली नाही तर मी आणि आमचा कायदा आहेच! (तिसऱ्याला) माझा निर्णय बरोबर आहे ना गुरुदेव!

तिसरा - शंभर टक्के.

दुसरा - चुप् बे. मायला, आमच्या बाजूनं व्होटिंग करायचं सोडून शिंव्हावर शिक्के मारत सुटलाय! आन् या उपऱ्याचे कपडे उतरवा रेऽऽऽ! च्या-यला बगू या तरी सिंव्ह हाय का बहुरुपी आहे ते. (सिंह हसतो) एऽऽऽ.

चौथा - आय् थिंक, द ऑथॉरिटी अँड कान्फिडन्स वुइथ वुईच. तो मानवी आणि पाशवी व्यवहार आणि कायद्याबद्दल बोलत होता त्यावरून तो नोकरशहा असावा.....

दुसरा - म्हंजी? आपन हिकडं आलो त्याचा फायदा घिऊन सरकारनं मुनशीपालटीवर ॲडमिनिस्ट्रेटर नेमला!

पहिला - एक दिवस ते होणारच होतं. पण हा तो असेल असं वाटत नाही.(सिंह हसतो.)

दुसरा - ए भेऽनचोत्!

सिंह - आया बहिणीवरून शिव्या दिल्यास तर मी रागवेन असं वाटलं? खुळा रेऽ खुळा! आमच्या जातीत आई, बहीण, बायको, मुलगी, मैत्रीण, रखेली, वेश्या अशी स्त्रियांची वर्गवारी करत नाहीत. स्त्री म्हणजे स्त्री! इतके प्रकार निर्माण करून तुम्ही माणसांनी काय मिळवलंत रे?

तिसरा - कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकं सिनेमे इत्यादींना विषय मिळवले. (चौथ्याला उद्देशून) त्याला विचार. ह्या विषयातला तो दर्दी आहे.

दुसरा - आता मात्रं लई झालं. (सिंह आणि तिसऱ्याला) दोघांनी थोबाडं बंद ठिवायची. न्हाई तर वाड्यावर नेऊन दिवाणखान्यात लटकवीन. वाघ-शिंव्हाची तीनचार मुंडकी हायेतच तिथे त्यात आनखी दोन मुंडक्यांची भर.

प्रिया - पूर्वजांच्या पुण्याईवर इतकी मुजोरी करणं बरं नव्हे! स्वतःचं काहीतरी कर्तृत्व दाखवा. सिंहराज उतरा आखाड्यात.

तिसरा - प्रिया असली विजोड कुस्ती लाऊ नको.

दुसरा - आरं हट् बाजूला!

सिंह - मुंडकी गोळा करण्याचा छंद आम्हाला परवडणार नाही. आम्ही रोजच कुणाला तरी मारणार. गुहेत तेवढी जागा पाहिजे ना! पण आज एक मुंडकं माझ्या गुहेत लटकणार! काय करणार? गुरु-पत्नीची आज्ञा!

तिसरा - सिंहराज ही माणसं फार राजकारणी आहेत. तुम्ही हि रिस्क घेऊ नका.

सिंह - घाबरु नकोस! राजकारण हा आमचा प्रांत नाही. तरी पावलोपावली त्यांच्याशी गाठ पडतेच. तुम्ही फक्त आशिर्वाद द्या!

तिसरा - विजयी व्हा! (तिघं शड्डू ठोकून रिंगणात यतात. आपापल्या पिशवीतून पिस्तुलं काढतात.) (सिंहावर रोखतात.)

सिंह - तुम्ही तिघं एकदम रिंगणात उतरणार? तेही पिस्तुलं घेऊन? म्हणजे तुम्हाला कुस्ती नाही लपंडाव खेळायचा आहे. चालेल. खूप दिवसात शिकाऱ्या बरोबर लपंडाव खेळलो नव्हतो. पण एक लक्षात ठेवा-जंगलाच्या राजा बरोबर लपंडाव खेळताय् गोळ्या जपून वापरा. ओ.के? मी रेडी म्हटल्यावर शूटिंग सुरु करायचं.

(सिंह एका झाडांमागं जातो. रेडी असं ओरडतो. पुन्हा बाहेर येतो. तिघं सिंहावर गोळ्या झाडतात. गोळ्या सुटल्याचा आवाज सुद्धा येत नाही प्रिया हसते आहे. सिंह एका उडीत दुसऱ्याची मानगुट धरतो.)

दुसरा - सिंहराज, चुकलो. माप‍ी करा. पण् माझं मुंडकं तुमच्या गुहेत टांगू नका.

प्रिया - सिंहराज मेलेल्याला मारण्यात काय अर्थ आहे? द्या सोडून.

दुसरा - तिच्या मायला, पिस्तुलं निकामी करून इस्वास घात केलास आन् वर ही शेखी?

पहिला - कुठून तुझ्या नादी लागलो असं झालंय्!

दुसरा - बसा आता मनगटं चावत.

चौथा - त्या पेक्षा (पहिल्याच्या कानांत काहीतरी सांगतो. पहिला डाव्या विंगमधे निघून जातो.) सो.... इन् द गिव्हन सरकमस्टन्सेस सिंहराज म्हणतात त्या प्रमाणं मानवी कायद्यानुसार प्रकरण आपापसात मिटवून टाकावं हे बरं! काय सभापती?

दुसरा - भऊमतानं ठरवा काय त्ये. मायला, लई कट्‌कट् झालीया. ह्ये कार्ट जल्माला आल्यापास्नं आडवं व्हायला उसंत मिळाली न्हाई. भरीत भर ... प्रशासक आलाय् आपल्या बोडक्यावर.

सिंह - तुम्ही सगळे लायनीवर आला आहात. मी निघू?

तिसरा - आम्हाला सोडून जाणार? मग आमचं संरक्षण कोण करणार या जंगलात?

सिंह - माझ्या कळपातून छाव्यांना पाळी पाळीनं पहाऱ्यावर बसवतो. (तिघांच्या जवळ जातो.) मी पहारे बसवतोच आहे. डोकी शांत ठेऊन प्रश्न आपापसात सोडवा. पण त्या दोघांना थोडा जरी त्रास झाला तर.... गाठ माझ्याशी आहे.... गुड् बाय् टु ऑल ऑफ् यू! (जातो)

(त्याचवेळी मुलाच्या रडण्याचा आवाज येतो. आता सगळ्यांचं लक्ष तिकडे. पहिला आत जातो. रडण्याचा आवाज वाढत जातो. प्रिया अस्वस्थ. मुलाच्या ओढीनं डाव्या विंगपर्यंत जाते. मागं वळते. असं एक दोन वेळा झाल्यावर ती मोठ्या कष्टानं स्वतःला सावरते.)

चौथा - काय झालं? माझा मुलगा रडतोय्. तुझं मनपण ओढ घेतंय्. तंबूत जाऊन पाज त्याला.

दुसरा - शिंव्ह गेला. मारक्या म्हशीवानी आमच्याकडं बघंत बसू नका. तंबूत जावूनशान चारचौघीपरमानं मुलाला पाजायला घ्या! (प्रिया मख्ख) काय चाललंय् काय? सबापतीचं ऐकत न्हाई. (चौथ्याला) तिला प ायनलचं सांग!

चौथा - आईचं दूध हा स्वातंत्र्याइतकाच प्रत्येक मुलाचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि...

दुसरा - आन् त्यो हक्क मिळालाच पायजे माज्या लेकराला!

प्रिया - माझ्या मुलाला...... माज्या ल्येकराला..... अरे कोण तुम्ही? मतलब साधायचा होता तेव्हा माझ्यापुढं गुडघे घासलेत. आणि आता बहुमताच्या जोरावर माझा लिलाव करायला तयार? वाऽरे पुरुष? असेल तेवढो हिम्मत तर पाजा त्याला छाताडावर घेऊन.

दुसरा - त्यो तुजा शिंव्ह पाजतो का त्याच्या छाव्यांना?

प्रिया - ज्या सिंव्हिणीनं छाव्यांना जन्म दिला तिला ओरबाडण्याचं पाप पण करत नाही तो!

तिसरा - प्रिया, डार्लिंग! शांत हो...... ऐक कसा कळवळतोय. अग, तो तुझासुद्धा आहे.

प्रिया - माझा ..... सुद्धा?

तिसरा - नाही नाही, तुझाच आहे.

प्रिया - हे तू अेकट्यानं मान्य करून काय उपयोग ?

तिसरा - (दोघांच्या जवळ जाऊन) मी तुम्हाला विनंती करतो हात जोडतो.

दुसरा - जोडायला हात मोकळं हैत का ? कदी बाईचा कासोटा तर कदी शिंव्हाची आयाळ धरून जगन्याची धडपड कर! बायकुच्या हातातलं भाऊलं भानचोद, आमाला शिकवतय्. चल प्ट्. पायातलं पायताण पायातच ठिवतो आमी. डोस्क्यावर घिऊन नाचत न्हाई.

तिसरा - प्रिया, बाळाच्या भविष्यासाठी तरी......

प्रिया - (निर्धारानं) मी मुलाला पाजणार नाही. त्यांची निर्मिती मी का पोसायची ? (मुलाच्या कळवळण्याचा आवाज) दुधाविना कळवळू दे! वाळू दे!! मुडदूस होऊ दे त्याला (हंसते) लांबट डोकं, मोठ पोट, पिचपिचे डोळे, हातापायाच्या काड्या, खाखा सुटल्यामुळं रात्रंदिवस किरकिर किरकिर (हसते) झोप म्हणजे एक प्रकारची ग्लानी. या सगळ्या दिव्यातून तारुण्यापर्यंत पोहोचला तर दौतीत टाक बुडवल्यासारखा ..... हाऽ हाऽऽ!

तिसरा - (किंचाळतो) प्रिया ..... आपल्या मुलाच इतकं भेसूर चित्र रंगवताना तुला भिती वाटत नाही ?

प्रिया - मी त्यांच्या मुलाचं चित्र रंगवलय. (दोघं हसतात.)

दुसरा - मायला, यवडी मिजास? आईचं न्हाई तर गाईचं दूध पाजू.

चौथा - गाय मिळाली नाही तर दुसरी बाई ठेवू. (दोघं हसू लागतात. प्रिया आणि तिसरा उजवी कडच्या तंबूत दिसेनासे होतात.)

चौथा - (दुसऱ्याला) तू थकल्यासारखा वाटतोस. आत जाऊन आडवा हो. बाळालाही झोपवण्याचा प्रयत्न कर. मी दुसरी किंवा गाय शोधण्याचा प्रयत्न करतो.

(दुसरा जातो. चौथा सिगरेट पेटवतो. प्रिया गेली त्या दिशेकडे बघत झुरके घेत राहतो. काही क्षणानंतर पहिला प्रवेश करतो.)

पहिला - काय झालं?

चौथा - बरं झालं तू आलास. जंगलात जा. आणि एकादी वाट चुकलेली, बिनधास्त, मध्यमवर्गीय संस्कार नसलेली बाई शोधून आण.

पहिला - बाई? कशासाठी?

चौथा - प्रियाची जागा घेण्यासाठी.

पहिला - (संतापून) बडवेगिरी किंवा भडवेगिरी करून मला पोट भरायचं नाही.

चौथा - हे बग! बाई माझ्यासाठी नकोय. बाळाला दूध पाजण्यासाठी हवी आहे.

पहिला - त्यानं दूधच प्यायलं पाहिजे असा आग्रह का? काय खायचं काय प्यायचं ते त्याला ठरवू दे.

चौथा - यू थिंक, तो ठरवू शकेल?

पहिला - नुसतं ठरवू शकेल नव्हे, ही विल सिलेक्ट! कॉन्टिनेंटल, ओरिएंटल, चायनिज, मुगलाई, मालवणी, पंजाबी, मद्रासी डिशेसचं इवलंसं मेनूकार्ड त्याचा इवल्याशा हातात देऊन आलोय्! (चौथा हसतो) काय झालं?

चौथा - खाण्या-पिण्याच्या बाबतीत इतकी मूल-गामी क्रांती होईल ही इवलीशो अपेक्षा सोडून दे!

पहिला - तुला म्हणायचं आहे कि तो जेवणाची ऑर्डर देणार नाही?

चौथा - नाही!

पहिला - तू हे आग्रहानं सांगतोयस् कारण तुला सिद्ध करायचं आहे कि तो माझा मुलगा नाही.

चौथा - हं बग!

पहिला - शट् अप् !

दुसरा - (प्रवेश करून) लागलात का पुना गुरगुरायला.

चौथा - तू परत का आलास?

दुसरा - माजी इवाप उडवली त्या भवानीनं.

पहिला - बाळाचा आवाज येत नाही. झोपला?

दुसरा - आमचा हात लागल्यावर दगडबी पेंगायला लागतात. ह्यो तर चिमुटभर मांसाचा गोळा!

पहिला - तो तुझा मुलगा आहे हे सिद्ध करण्यासाठी खोटं बोलतोयस्.

दुसरा - माज्या बंगल्या समोरच्या गल्लीच्या तोंडाशी मारुतीचं देऊळ हाय? बिगितलय् कां?

पहिला - हो. डुलक्या मारुती म्हणतात त्याला.

दुसरा - त्ये हल्लीचं नाव. आधी त्याला जागत्या मारुती म्हनंत असंत. गेल्यासाली हनुमान जयंतीला म्या चीफ गेश्ट व्हतो. रुईच्या पानाचा हार मारुतीच्या गळ्यात घातला मात्र, गप्कन डोळे मिटून लागला कि डुलक्या घ्यायला.

पहिला - एक मोकाट बाई आणलीच पाहिजे.(अरण्यात निघून जातो.)

चौथा - बाळ खरंच झोपलाय कि तू त्याच्या तोंडात काही दिलंयस? ..... चिरटोळी? बोंडल ? बोंडशी?

दुसरा - असल्या गोस्टी जंगलात कुठून मिळणार?

चौथा - मिळणार नाहीत म्हणूनच संशय आला. काय दिलंस?

दुसरा - बाईची बेशियर.

चौथा - यू चीट, माझी हत्यारं वापरुन, मुलाला झोपवायचं आणि ते स्वतःचं असल्याचं सिद्ध करण्याचं हे राजकारण मला कळणार नाही असं वाटलं. उबग येत चाललाय तुझ्या असल्या राजकारणाचा.(जावू लागतो.)

दुसरा - ए, रागावून जाऊ नगंस. माज ऐक जरा. आपुन दोगानी तरी आपापसांत भांडन करून चालनार न्हाई. आरं येकाच हंथरुणाच्या दोन हिश्श्यांत भांडन कशाला?

चौथा - म्हणजे काय?

दुसरा - वाईच थंड डोक्यानं इचार कर म्हंजी ध्येनात येईल. माझी झोपन्याची ॲक्टीव्हिटी वरच्या भागात चालते. तुजी खाली. म्हंजी झालं कि न्हाई दोन हिश्शे? इतरांनी पाटाप्ट केलीच हाय्. आपन् दोगांनी युनिटी राखली तर त्ये पोरगं नक्की आपली गादी चालवंल!

(आतून पहिल्याची आरोळी - 'सापडली. बाई सापडली.' त्याचवेळी प्रिया आणि तिसरा तंबूच्या बाहेर येतात. प्रिया दुर्बिण लावून बघते.)

तिसरा - काय झालं? कोण सापडली.

प्रिया - एक बाई येत आहे. जख्ख म्हातारी. माझी जागा घेण्यासाठी. त्या तिघांची जागा घेईल असा मला पण शोधला पाहिजे. (दुर्बीण तिसऱ्या जवळ देते.) तू लक्ष ठेव. मी आलच! (जाते. तिसरा दुर्बीणीतून बघत राहतो. पहिला एका जख्ख म्हातारीसह प्रवेश करतो.)

पहिला - जवळच सापडली.

चौथा - हं बग!

पहिला - आता काय झालं?

चौथा - शेकोटीत टाकायला लाकडं मिळत नव्हती म्हणून ही मोळी आणलीस- द बंडल ऑफ बोन्स?

पहिला - नीट बघ म्हणजे तुला कळेल की ती बाई आहे. कारण ती माझ्या बरोबर चालत इकडं आली आणि तिच्या हाडावर मधून मधून मांसाचे गोळे आहेत.

चौथा - ते काय गोळे आहेत? पाघळलेल्या चामडीच्या पोतडीत लोंबणारे मांसाचे तुकडे! बुलशिट्! माझे विचार कधीच तुझ्या गळी उतरणार नाहीत. एकादा विचार गळी उतरलाच तरी तू तो पचवूं शकणार नाहीस!

(पहिला एकदम तावांत येऊन चौथ्याचा गळा धरतो.)

चौथा - व्हॉट इज धिस् नॉनसेन्स! सोड. सोड.

पहिला - माझा (गळा) आणि पोट या बद्दल एक शब्द काढायचा नाही. आहे कबूल.

चौथा - असली बाई आणून तू पुन्हा माझी टर उडवणार नाहीस असं तू कबूल कर आधी. (तिघं तावातावानं बोलत राहतात. पण त्यांचा आवाज ऐकू येत नाही.)

प्रिया - (आतून) लक्ष आहे ना तुझं?

तिसरा - हो आहे!

प्रिया - (आतून) काय चाललं आहे तिकडं?

तिसरा - माझी भिती खरी ठरत आहे. दोघं भांडत आहेत.

प्रिया - चालूदे. तू पण तुझं काम करत रहा.( हसते. तिसरा पुन्हा डोळ्याला दुर्बीण लावतो.)

दुसरा - ए गपा! मायला, तिकडं इरोधक मोर्चे बंदी करत हैती. आन् तुमी आपापसात भांडन सुरु केलंत? (चौथ्याला) तुला काय पायजे व्हतं?

चौथा - आय् वॉंटेड ए बाई. प्रियाची जागा घेऊ शकेल अशी.

पहिला - ही बाई तशीच आहे.

चौथा - तशी नाही.

पहिला - आहे.

चौथा - नो!

पहिला - शट् अप्.

चौथा - यू शट् अप्.

दुसरा - दोघं शट् अप्! या बाईला रिपेर करून समदं जिथल्या तिथं आनून देन्याचं कंत्राट मला द्या!

पहिला - दिलं!

चौथा - थँक्यू. मला वाटलं नव्हतं तू माझ्या मदतीला धावून येशील!

दुसरा - आरं आमची जात शब्दाची पक्की. चला. आत जावा. भांडन करू नका. पोरगं उठून बसलं की आनखीन बट्याबोळ! तिला रिपेर करी पोत्तर तरी त्यो झोपलेला ऱ्हाऊ दे.(दोघं आत जातात. म्हातारीला) आजोबाई, काय नाव तुमचं?

शबरी - शबरी!

दुसरा - शब्री? च्यायला, रामाला उष्टी बोरं खायला घालनारी शब्री?

शबरी - तीच रे मी लक्ष्मणा.

दुसरा - लक्ष्या त्यो, ज्यानं तुमाला हितं आनलं.

शबरी - मग तू कोण? तूच का तो राम, ज्याची मी युगानुयुगं वाट बघत होते!

दुसरा - न्हाई. म्या दशरथ. तुमच्च्यासाठी कळवळणाऱ्या रामाचा बाप.

शबरी - तुम्ही लोक असे कसे? एवढ्या तेवढ्या वरुन भांडता काय, बोलता काय, भाषा कसली वापरता. सरळ सोपेपणा काही नाहीच. सगळं गूढ!

दुसरा - या समद्या नव्या युगाच्या खाणाखुणा हैत.

शबरी - मी इतकी युगं पाहिली पण तुमच्या सारखी माणसं पाहिली नव्हती. माझा राम कुठाय्? दाखवा आणि माझा उद्धार करा एकदाचा!

दुसरा - येक मिनिट! लिमलेटची गोळी खानार? (खिशातून एक गोळी काढतो. तिला देतो.)

शबरी - कसल्या तरी पाल्याची गोळी दिसतीय्! (वास घेते.) आंबट गोड वास येतोय्.

दुसरा - वास आवडलां? मग गोळी गिळून टाका. रामाचा परसाद् हाय् असं समजा. चला आंत. (शबरी गोळी खाते. दोघं आत जातात.)

तिसरा - (दुर्बिणीतून बघता बघतां) प्रिया, प्रिया.

प्रिया - (प्रवेश करून) काय झालं?

तिसरा - सभापतींनी त्या म्हाताऱ्या बाईला कसल्या तरी पाल्याची गोळी खायला दिली. आणि आता घडतंय् ते फारच ....... फारच ...... बापरे ..... अरेच्या ..... व्वा! सुंदर!! अति सुंदर!!

प्रिया - (तिसऱ्याच्या हातून दुर्बिण खेचून घेते. बघत राहते. नंतर) तेच जुनं मदर अँड चाईल्ड मॉडेल, हॉर्स पॉवर बदलून बाजारात आणलं आहे. (हसते.)

तिसरा - अगं पण त्या थेरडीने तुझी जागा घेतलीय्. ती मुलाला पाजत्येय्. तिघं तिच्या भजनी लागली आहेत. आणि हे सगळं तू आनंदानं स्वीकारते आहेस?

प्रिया - होय! कारण त्यात विचार करण्यासारखं किंवा घाबरण्यासारखं काहीच नाही. काही नव्या काही जुन्या रंगाच मिश्रण करून रंग बदलण्याचं नाटक करणारे हे सरडे. त्यांची मजल कुठपर्यंत? फार तर कुंपणापर्यंत! त्यांची झेप हीच त्यांची मर्यादा.

तिसरा - आधीच्या अनुभवावरून मला वाटत आहे की ते फार मोठी मोर्चेबंदी करीत आहेत. आपण गाफील राहून चालणार नाही.

प्रिया - मी गाफील नाहीच. (ब्लाऊजमधून एक छोटा लिफाफा काढते.) हे घे सिंहराजाला नेऊन दे.

तिसरा - (प्रचंड घाबरुन) प्रिया, तू .... तू माणसाला शह देण्यासाठी एका पशूशी संधान साधणार?

प्रिया - तो अर्धा माणूस आहे. माझ्या सहवासात राहिला तर पूर्ण माणसाळेल. जा.

तिसरा - पण तू इथं एकटी काय करणार ?

प्रिया - (एकदम गंभीर होऊन) माझ्या अंगावर भाजल्याच्या खुणा आहेत. त्या मिटवत बसणार आहे.

तिसरा - मी समजलो नाही.

प्रिया - ओल्या बाळंतिणी बाजल्यावर पडून शेक घेतात. तुम्ही मात्र मला ताप-चटके दिलेत. मी ओल्याची कोरडी केंव्हा झाले ते मला कळलंच नाही. जा तू.

(तिसरा जातो. प्रिया पण तंबूत जाते. क्षणभर रंगमंच मोकळा. नंतर अचानक संगीत सुरु होतं. काही क्षणानंतर नर्तकीच्या वेषातील पण संगीतानुरूप नृत्य करत आणि गात शबरी प्रवेश करते. 'माझं नांव आहे शबरी! पण काही लोक मला शब्बो म्हणतात.' शबरी शबरी या शब्बोऽऽ, डिंग डाँग डिंग डाँग डिग डाँग.... गाणं संपल्यावर शब्बो घाम पुसते. पहिला प्रवेश करतो.)

पहिला - शबनम्, बाळाला पोटभर पाजलस त्याबद्दल धन्यवाद.

शब्बो - इश्यू! धन्यवाद कशाला? स्त्रीचं कामच आहे ते. (पहिला जाऊ लागतो.) कुठं निघालात?

पहिला - गांवांत चक्कर टाकून येतो.

शब्बो - पण जेवणाच्या वेळेपर्यंत परत यायचं गडे आज मी सशाची सागुती करणार आहे.

(पहिला जातो. दुसरा प्रवेश करून शब्बोकडे न बघता पुढं जाऊ लागतो. शब्बो त्यास अडवते.

शब्बो - आत्तागं बया? मुलाचं आवरता आवरता तुमच्या दिमतीला यायला वाईच उशीर झाला म्हनून काय इतकं रागवायच आपल्या मानसावर? पोरगं झोपलय तोवरच थोडी उसंत मिळनार. नेमकं त्याच टाईमाला तुमचं पाऊल भाईर. शीऽऽऽ बाई.

दुसरा - तुमचं मन आमाला कळतंय! गावाकडं चक्कर टाकलीच पायजे. राजकारनाचे डावपेंच तुमाला न्हाई कळनार.

शब्बो - न कळायला काय झाल? मुनशिपाल्टीच शेशण लांबलं अन् तुम्ही जेवाया न्हाई आलात किंवा राजकारनाच्या धकाधकीत डोस्क फिरलं अन् तुम्ही दोन मिन्ट कुटं विसावलात तर मी काय तक्रार करनार हाय? पन् झोपन्याआदी माज्याकडनं पाय चेपून घेतलं तर राजकारन बुडणार हाय का?

दुसरा - तसं न्हाय शब्बोरानी. आता तुमाला ......

शब्बो - काई सांगू नका. झोपायला घरीच यायचं. पहाट झाली तरी.

दुसरा - च्या मायला, समद्या बायका तुमच्या सारक्या समजूतदार निगाल्या तर तांबडं फुटपर्यंत कोन भाईर झक मारंल?

शब्बो - ईश्य!

(दुसरा जातो. काही वेळानं सिगरेट पीत पीत, प्रियाच्या तबूकडं बघत चौथा प्रवेश करतो. क्षणभर तसाच बघत राहतो. शब्बो मागनं येऊन त्याच्या पाठीवर डोकं टेकते.)

चौथा - हाय शबी! (पुन्हा दूर बघत राहतो.)

शब्बो - (त्याच्या समोर येऊन) बस्? एवढंच? ओनली हाय?

चौथा - मग आणखी काय करू?

शब्बो - ओ माय् पुअर डियर, तुझी हालचाल, तुझ्या चेहऱ्यावरचे भाव, तुझे लुक्स, एवरिथिंग इंडिकेटस् की तू मोठ्या मानसिक दडपणाखाली वावरत आहेस. मला सांग, पहिल्या बायकोची आठवण येत आहे?

चौथा - हंबग! तसल्या आठवणी मी कधीच जपल्या नाहीत.

शब्बो - दॅटस् गुड्!

चौथा - पण......

शब्बो - पण काय?

चौथा - तू म्हाताऱ्या शबरीची शबनम् आणि नंतर तरणी बांड शब्बो झालीस ते वास्तव पचवायला काहीकाळ जावा लागेल. (पट्कन् निघून जातो.)

शब्बो - (तो गेला त्या दिशेकडं बघून) दॅटस् फाइन्. बाळाला चालतं बोलतं करायला मला तेवढीच फुरसत मिळेल. (तिसरा दबकत दबकत प्रवेश करतो. प्रियाच्या तंबूकडं जावू लागतो. शब्बो त्याला हाक मारते.)

शब्बो - एऽऽ! शुक् शुक्! (तो बावचळलेला. घाबरून इकडं तिकडं बघतो. शब्बो तोंडात बोटं घालून चक्क शिट्टी वाजवते.)

तिसरा - क.... क.... कोण आहे. (शब्बोची आणि त्याची दृष्टा दृष्ट होते.) त...त.... त...तू?

शब्बो - होय्! म....म....म.... मीच! शबनम-शब्बो. ए अगदी ओळख नसल्यासारखं काय करतोस? मी इकडे आले तेंव्हापासून दुर्बिणीतून एक टक नजरेनं माझ्याकडं बघत होतास. आणि आताच..... ये, जवळ ये. तिकडं कुठं जातोयूस?

तिसरा - म....म....मी घरी जात होतो.

शब्बो - घरी? तिकडं कुठं? घाबरून वाट फुटेल तिकडं धावणं बरं नाही. तुझं खरं घर इकडं आहे. येऽऽ (तो हळू हळू शब्बोच्या जवळ जातो. नंतर मुलाच्या रडण्याचा आवाज येतो.) आले रे बाळा, दोन मिनटं थांब हं! (तिसऱ्याला) अजून मनांत संशय आहे. घराला, मला-खुशाल विसरा. पण तुमच्या बाळाला सुद्धां? (रडते)

तिसरा - शबरी.... शबनम.....शब्बो, रडू नको.गंऽऽ.

शब्बो - बायकांच्या नशिबी रडण्याशिवाय् दुसरं काय असतं? चार भिंतींचे संरक्षण असतं तर मी धीर धरला असता. पण माझ्या घराला तीनच भिती आहेत. मला भिती वाटते.... मोकळ्या

बाजूनं एकादं मोकाट वारं घरात घुसलं आणि त्यानं मला, माझ्या बाळाला उडवून नेलं तर.....?

तिसरा - नाही. तसं होणार नाही. मी होऊ देणार नाही. भिंतीसारखा उभा राहून बाळाचं रक्षण करीन.

शब्बो - मला खात्री होती. पान वाऱ्यावर कितीहि भिरभिरले तरी शेवटी त्याला जमिनीवरच विसावावं लागतं.

(शब्बो त्याच्या खांद्यावर डोकं टेकते. दोघं डाव्या विंगमधे दिसेनासे होतात. अंधार क्षणभरानं प्रियाच्या तंबूवर प्रखर प्रकाश. प्रिया बाहेर येते. सगळीकडं बघते. भयाण शांतता. फक्त रातकिड्यांचा आवाज ऐकू येतो. शेकोटीच्या एका बाजूला अर्धवर्तुळाकार कोंडाळं करून चौघं बसले आहेत. दुसऱ्या बाजूला सिंह उभा आहे. सूट-बूट. गळ्यात पाटी 'खरा नर'! सगळ्यांची ओली/पार्टी चालू आहे. दोन राऊंडस् संपत आले आहेत.)

चौथा - मिस्टर सिंह, आर यू शुअर.... हिंसाचाराला उत्तेजन देण्याचा प्रियाचा विचार होता.

सिंह - तसा नसतां तर तिनं मला प्रेमपत्र लिहीलंच नसतं. तिनं लिहीलेला एक एक विचार वाचून मलाहि धडकी भरली. त्याच वेळी मी दोन निर्णय घेतले. एक प्रियाला माळरानासारखं भाकड करून टाकायचं. आणि दोन- लवकरांत लवकर माणसांना जाऊन मिळायचं!!

पहिला - तुमच्या या क्रांतीकारी निर्णयाचं आपण स्वागत करू या. (आत बघून) शब्बो, ॲडमिनिस्ट्रेटर साहेबांचा ग्लास रिकामा झालाय्. मंचिंगसाठी पण आण काहीतरी.

(शब्बो प्रवेश करते. तिच्या हातात दारुची बाटली आणि खाऱ्यादाण्याची बशी आहे. आळीपाळीनं सगळ्यांचे ग्लास भरते. निघून जाते.)

सिंह - एका दृष्टीनं ... मी प्रियाला दोष देणार नाही. इतके दिवस जंगलात काढले. नाही म्हटलं तरी भोवतालच्या परिस्थितीचा परिणाम माणसाच्या विचारावर होतोच!!

पहिला - अरे पण प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा असते की नाही? का आपलं तुटेपर्यंत ताणायचं?

तिसरा - हीच गोष्ट तिला समजावण्याचा मी अनेक वेळा प्रयत्न केला. पण प्रिया ऐकायलाच तयार नाही!

दुसरा - मायला, महा चढेल बाई हाय् ती म्हनेल त्येच खरं! नवं काई जन्माला घालायचं, तर तीच येक बाई! मोनापलिश्ट साली.

(मि.सिंह सोडून सगळ्यांना दारू चढू लागली आहे.)

सिंह - सभापतीजी, तिच्या याच चढेलपणानं तुम्हाला भुरळ घातली होती. अहो राजकारणाचा भाग म्हणून ते ठीक होतं. पण नंतर तुम्ही तिघंही वाहवत गेलात. एकमेकांशी भांडू लागलात. एका नांदत्या घरांत कॅओस निर्माण झाला.

चौथा - बट मिस्टर सिंह, दॅट वॉज द नवा विचार आपल्याला तिच्याकडून मिळालेला होता.

सिंह - अरे होय् रे. पण त्याला मान्यता कां देता. अशी मान्यता देत सुटलात तर हे क्रिएटिव्हवाले आपल्या हातात भिकेचा वाडगा देतील.

तिसरा - मग काय करायचं?

सिंह - त्यांचे विचार आपल्या पद्धतीनं राबवायचे! केऑस मधूनच युनिटो प्रस्थापित करायची.

दुसरा - अवो त्येच केलं. तुमी सांगितल्यापरमानं जादूच्या पाल्याचे दहा ट्रक गावाकडं रवाना केले. बरोबर गेलेल्या फॉलोअर्सना सांगितले- माणूस दिसला कि गोळी कोंबायची तोंडात.

सिंह - त्याचा परिणाम काय झाला कळलं कां?

पहिला - जो गोंधळ सुरु झाला. सगळ्यांना खा-खा सुटली. दिसेल त्या हॉटेलावर झडप घालत होतं पब्लिक. गाढवाची बिर्याणी खायला घातली तरी कळलं नाही, मिटक्या मारत खाल्ली!

चौथा - ऑफ् द् टोटल इफक्ट, धिस वॉज् ओनली थ्री पॉईंट टू फॉईव्ह परसेंट ऑर सो. द मोस्ट अफक्टड क्लास वॉज् स्त्री वर्ग! पाल्याची गोळी खाऊन म्हाताऱ्या संसाराला लागल्या. पुरुषांच्यावर सुद्धा परिणाम झत्तला. बासष्ट वर्षाचा रिटायर्ड म्हातारा सव्वीस वर्षाचा होऊन नोकरी मागू लागला. (सगळे हसून एकमेकाला टाळ्या देतात.)

दुसरा - इरोधी पक्ष्याची तर पार दैना झाली. टी.व्ही.वर जाहिराती येत्यात-आपन् त्यांना पाह्यलंत कां? (प्रचंड हसूं)

सिंह - सभापती, गावाकडं परत जाण्याला हीच चांगली संधी आहे.

दुसरा - माज्या मनांतलं बोललात. परत जायचं पन् मिरवणुकीनं!! गावांकडं गेलेल्या ट्रकमधून बँड आन् आपले फालोअर आनन्याची वेवस्था केली हाय!

(आतून बँडचा आवाज ऐकू येतो. बँडवर 'मेरी बूढी बहनिया बनेगी दुल्हनिया' या गाण्याची धुन् वाजत आहे.)

दुसरा - आयला, नाव काढायचा अवकाश- पब्लिक हजर!!

(बँडचा आवाज जवळ जवळ येऊ लागतो. पहिला, दुसरा आणि चौथा त्या तालावर नाचू लागतात.)

तिसरा - मि.सिंह, मी प्रियाला सांगून येवू कां?

सिंह - काय?

तिसरा - थोड्याच वेळात हे जंगल सोडून गावाकडं परत जायचे आहे. तयारी कर.

सिंह - तुला वेड लागलंय्? प्रियाला राहू दे इथंच!

तिसरा - एकटी? या जंगलात? मरून जाईल ती.

सिंह - आपण श्राद्ध करून टाकू मोठ्या थाटात! (तिसरा प्रचंड घाबरलेला.) तू एवढां घाबरतोस कां? अरे माणूस काय पशू काय केव्हातरी मरायचाच!

तिसरा - मग माझ्या बरोबर येऊन प्रियाला का त्यांच्या तावडीतनं सोडवलंत?

सिंह - सोडवल? असेल! कारण तुम्ही चौघं पुन्हा एकत्र येईपर्यंत प्रिया जिवंत रहावी असं मला वाटत होतं. त झालेलं आहे. आता तिच्या आयुष्याला अर्थच उरला नाही.

(तिसरा वेड्यासारखा हसायला लागतो. बँडची धुन् आणखी जवळ आल्यासारखी वाटते. त्या आवाजात तिसऱ्याचं हसणं ऐकू येत नाही. नंतर 'सभापती-झिंदाबाद'च्या घोषणा ऐकू येतात. दुसरा, उजव्या विंगपर्यंत जातो. नमस्कार करतो. नंतर हात उंच करून सगळ्यांना थांबण्याची खूण करतो. बँड, घोषणा एकदम बंद. दुसरा डाव्या विंगकडं येतो.)

दुसरा - शब्बोरानीऽ, निघायला हवं. गाडी घोडं समदं आलं. या भाईर.

(सगळे शब्बो येणार आहे त्या दिशेकडे बघत राहतात. काही क्षणानंतर मुलाला घेऊन शब्बो प्रवेश करते. त्याचवेळी प्रियापण उजव्या विंगमधून प्रवेश करते. शब्बो आणि प्रिया एकमेकीला न्याहळतात. शब्बो घाबरते.)

शब्बो - ती दुसरी बाई कोण आहे?

(सगळे वळून बघतात. नंतर चौघं शब्बोच्या भोवती कोंडाळं करतात. प्रियाच्या डोळ्यात संताप. सिंह आणि प्रिया एकमेकांकड बघतात. प्रिया सिंहाच्या जवळ जाते. काड्कन् त्याच्या मुस्काडीत मारते. सिंह क्षणभर हेलपाटतो. सावरतो.)

दुसरा - तिच्या मायला, पुन्यांदा वळवळायला लागली?

पहिला - आय्.ए.एस्.च्या मुस्काटांत?

प्रिया - (चौघांच्या जवळ जावून) मग त्यात काय बिघडलं? सभापती, भानावर या. आज तो तुम्हाला पाठिंबा देतोय्. पण उद्या सगळ्यांना स्वतःच्या तालावर नाचवील. तुम्ही केलेल्या कामाचं श्रेय तो उपटेल. त्याच्या भावी पिढ्यासुद्धा अशाच निपजणार आहेत.(चौघांना) हे

बघा, माझं ऐकायचं नसेल तर खुशाल त्याच्या मागं जा. पण माझं मूल परत द्या. त्याची अशी विटंबना करू नका.

दुसरा - अंगावर न पाजून तूच त्याला वेडावाकडा करायला निगाली होतीस.चल् हो दूर!

प्रिया - नाही. नाही. प्लीज मला समजून घ्या!

पहिला - कमरेत लाथ घालून मला इतकं दूर उडवलस. मी तिथून परत येऊच शकत नाही. जा. चालती हो.

प्रिया - (तिसऱ्याला) तू तरी विचार कर.

तिसरा - मला विचार करायची भिती वाटते. मी फार तर तुझ्यासाठी देवाची प्रार्थना करीन.

सिंह - तिच्याशी बोलत बसू नका. आपल्याला उशीर होतोय्.

(प्रिया चौघांना अडवण्याचा प्रयत्न करते. सगळे तिला दूर लोटतात. ती रंगमंचाच्या मध्यावर पडते. सगळे उजव्या विंगमधे दिसेनासे होतात. फक्त सिंह छद्मीपणे हसत उभा आहे. प्रिया जिवाच्या आकांतानं उठून सिंहावर धावून जाते. सिंह विंगमधे पसार होतो. प्रिया त्यामागे जाते. जेमतेम उजव्या विंगपर्यंत पोहोचली आहे. आतून पिस्तुलाचा आवाज येतो. गोळी प्रियाच्या घशात घुसते. प्रिया रक्तबंबाळ होऊन होलपटत स्टेजच्या मध्यावर येते. तिला ओरडायचय, बोलायचंय्. पण आवाज फुटत नाही. फक्त ओठांच्या हालचाली. काही क्षणाच्या धडपडीनंतर ती कोसळते. आतून बँडची धुन् सुरु होते. ती जसजशी दूर जाते, तसतसा अंधार पसरत जातो.)

- समाप्त -

## एक मोकाट वारं

### प्रवेश ३ रा

(प्रियाची बेड रूम. डॅडी प्रियाला पलंगावर झोपवतात. मम्मी घाबऱ्या घुबऱ्या प्रवेश करते, प्रियाच्या जवळ जाते. तिच्या तोंडावरून, अंगावरून हात फिरवते. ती हालत नाही, बोलत नाही असं बघून नवऱ्याजवळ जाते.)

मम्मी - अहो, आपल्या प्रियाला काय झालं बघाना? ती हलत नाही, बोलत नाही. डॉक्टरला फोन करा.... मख्खासारखे उभे काय राहिलात? ..पिस्तुलाच्या गोळीचा आवाज आला म्हणून सैपाक घरातून धावत आले. काय चाललं होतं प्रियाच्या बेडरुममधे? कुणी झाडलं पिस्तुल? कावरेनं? डॉ.चवथ्यांनी ..की तुम्हीच?

डॅडी - हे बघ.....

मम्मी - माझ्या पोटच्या गोळ्याचं-समोर पडलेले प्रत बघतीयच मी. पण कुणी पिस्तुल झाडलं ते तुम्ही अजून सांगितलं नाहीत! कुणाच्या गुन्ह्यावर पांघरूण घालताय? ज्यांच्याशी आपला काही संबंध नाही त्यांच्या गुन्ह्यावर? कशासाठी? आय्.अे. एस्.चा रुबाब पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी? पैशासाठी? की आपलंच पाप झाकण्यासाठी? तुम्हीच स्वतःच्या मुलीवर बलात्कार केला नाहीत ना?

डॅडी - शट् अप्! ..... कुत्रा पिसाळला की त्याला गोळीच घालावी लागते! प्रियानंच घाणेरडी स्वप्नं रंगवायला सुरुवात केली होती, चार चार जणांबरोबर झोपून त्या पैकी कुणाचं मूल जन्माला येतय् ते बघण्याचा प्रयोग करायचा होता म्हणे तिला! बुल शिट्!! अशा मोकाट स्त्रीला ठार मारुन समाजावर उपकारच केलेत मी!

मम्मी - व्वा! पुरुषप्रधान व्यवस्थेचे सच्चे राखणदार शोभता मिस्टर सिंह!! नवं कांहीतरी जन्माला घालण्याची स्वप्नं कुमारिकेनं पाहायची नाहीत तर काय मी बघायची? चार चार स्त्रियांवर

बलात्कार करून त्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या गुंड नेत्यांना आणि त्यांच्या चिल्यापिल्यांना पाठीशी घालणारे तुमच्या सारख्यांचा जगण्याचा अधिकार मी काढून घेणार आहे.

(गाऊनच्या खिशातून सुरा काढते. डॅडी पुढं सरसावण्या आधीच त्वेशानं चार पावलं पुढं होऊन सुरा स्वतःच्या पोटात खुपसते..... आक्रोश करून प्रियाच्या प्रेताजवळ पडते. हळू हळू अंधार होत जातो.)

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

हा नंबर7710980841किंवासेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे .